cmyk

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१६ | शनिवार दि. ०४ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### जनगणना २०२६ : बदलत्या

देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रवासाला दिशा देणाऱ्या सर्वात महत्त्वाच्या प्रक्रियांपैकी एक असलेल्या जनगणनेची मोहीम अखेर १ एप्रिल २०२६ पासून सुरू झाली आहे. तब्बल १५ वर्षांच्या अंतरानंतर सुरू झालेली ही जनगणना केवळ आकड्यांची मोजदाद नसून भारताच्या बदलत्या वास्तवाचे प्रतिबिंब दाखवणारा आरसा आहे. त्यामुळेच या मोहिमेकडे केवळ प्रशासकीय उपक्रम म्हणून नव्हे, तर राष्ट्रीय बांधिलकी म्हणून पाहणे गरजेचे आहे.ङ्गभारतामध्ये जनगणनेचा इतिहास दीडशे वर्षांहून अधिक जुना आहे.

# राज्यातील ऊस गाळप हंगाम अंतिम टप्यात!

## राज्यात आतापर्यंत ९८.८७ लाख टन, तर देशात २७१ लाख टन उत्पादन

**पुणे । प्रतिनिधी**

यंदाच्या ऊस गाळप हंगामाच्या सुरुवातीला देशात ३५० लाख टन, तर राज्यात ११० लाख टन साखरेचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. मात्र, आता हे एकूण साखरेचे उत्पादन अनुक्रमे ३१५ आणि १०० लाख टन होईल, असे चित्र आहे. राज्यात आतापर्यंत ९८.८७ लाख टन, तर देशात २७१ लाख टन उत्पादन झाले आहे.

राज्यात पुढील १० दिवसांत गाळप हंगाम संपण्याची शक्यता आहे. देशातून यंदा सात ते आठ लाख टन साखर निर्यात, तर ३१ लाख टन साखर इथेनॉलकडे वळविली जाणार आहे. देशात यंदा गाळप



हंगाम सुरू झाल्यानंतर सुरुवातीला ३५० लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. मात्र, ३१ मार्चअखेर देशात २७१ लाख टन उत्पादन झाले आहे. महाराष्ट्र व उत्तर प्रदेश या सर्वात मोठ्या साखर उत्पादक राज्यांपैकी महाराष्ट्रात पुढीत ८ ते १० दिवसांत, तर उत्तर प्रदेशातही लवकरच हंगाम संपेल. यंदा गाळपास आलेला ऊस जवळपास संपला आहे. तर यापुढील गाळपातून साखर उतारा चांगला मिळत नाही. परिणामी उत्पादनात घट होणार आहे. त्यामुळे यापूर्वी ३५० लाख टन उत्पादनाचा अंदाज आता २८३ ते २८५ लाख टनांवर आला आहे. तर अतिरिक्त ३१ लाख टन साखर इथेनॉलकडे वळविण्यात येणार आहे. महाराष्ट्रात सुरुवातीला ११० लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. यंदा एकूण २१० सहकारी व खासगी कारखान्यांनी गाळप हंगामास सुरुवात केली होती. त्यापैकी १८७ कारखान्यांची धुराडी बंद झाली असून, उर्वरित २३ कारखाने पुढील ८ ते १० दिवसांत बंद होतील अशी स्थिती आहे. आतापर्यंत १ हजार ४३ लाख टन उसाचे गाळप झाले आहे. त्यातून आतापर्यत ९८ लाख ८७ हजार टन साखर उत्पादन झाले आहे. तर सरासरी साखर उतारा ९.४८ टक्के मिळाला आहे. सर्वाधिक साखर उत्पादन कोल्हापूर विभागात २३ लाख १९ हजार टन त्यानंतर पुणे विभागात २२ लाख १८ हजार टन, तर सोलापूर विभागात १९ लाख टन साखरेचे उत्पादन झाले आहे. राज्यात अंदाजित साखर उत्पादनापेक्षा १० लाख टन उत्पादन कमी होणार आहे.

# शिंदे, तटकरे, चंद्रकांत पाटील होते खरातच्या संपर्कात!

## कॅप्टनला खरातला कितीवेळा कॉल केला याची यादीच दमानियांनी केली सादर



**मुंबई । प्रतिनिधी**

शेकडो महिलांचे लैंगिक शोषण व फसवणुकीचे गंभीर आरोप असलेला भोंदू अशोक खरात प्रकरणात राज्यातील मोठ्या नेत्यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री चंद्रकांत पाटील, सुनील तटकरे, आशिष शेलार यांच्यासह अन्य नेत्यांचे खरात सोबतच्या संभाषणाची कॉल डिटेल्सची (सीडीआर) कॉपी अंजली दमानिया यांना मिळाली आहे. ती कॉपी डीजी आणि मुख्यमंत्र्यांना पाठवली असून, याबाबत एसआयटीच्या चौकशी अधिकारी तेजस्वी सातपुते यांनाही माहिती दिली आहे, असा दावा दमानिया यांनी केला आहे.

राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी म्हटले होते की, अशोक खरात हे माझे गुरु आहेत, त्यांच्याबद्दल मला काही माहिती नाही, आमचे फक्त कौटुंबिक संबंध आहेत. मात्र, सीडीआरमधून समोर आलेल्या माहितीनुसार रूपाली चाकणकर आणि अशोक खरात यांच्यात १७७ फोन कॉल झालेले आहेत. त्याचप्रमाणे, त्यांच्या बहिणी प्रतिभा ◀◀ पान २ वर

### चाकणकर आणि केसरकरांच्या जवळचे लोंढे यांचे सर्वाधीक बोलणे

या सर्व कॉलमध्ये सर्वाधिक संभाषण तृप्ती खरात यांच्याशी झाले आहे, जे घरचे असल्यामुळे ते स्वाभाविक मानता येईल. मात्र, सर्वात धक्कादायक बाब म्हणजे रूपाली चाकणकर यांचा नंबर दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्यांच्यात एकूण ३३,७२७ सेकंद इतके संभाषण झालेले आहे. इतका वेळ कोणत्याही गुरुशी कोणी बोलत नाही, त्यामुळे रूपाली चाकणकर आणि अशोक खरात यांच्यात नेमके काय संभाषण झाले, याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. तिसरे नाव दीपक लोंढे यांचे आहे. लोंढे हे दीपक केसरकर यांचे अतिशय जवळचे व्यक्ती मानले जातात. त्यांच्या आणि अशोक खरात यांच्यात १९० कॉल झालेले आहेत, आणि एकूण ३०,५२९ सेकंद संभाषण झालेले आहे.



# राज्यातील अनेक भागात वीजपुरवठा खंडित

**पुणे/मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील शहर व परिसरात गुरुवारी दुपारी विजांच्या कडकडाटासह झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि वादळामुळे अनेक अतिउच्चदाब व उच्चदाब वाहिन्यांमध्ये बिघाड झाला. परिणामी, राज्यातील अनेक भागांतील वीजपुरवठा खंडित झाला. वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणचे कर्मचारी युद्धपातळीवर परिश्रम घेत आहेत. दरम्यान काही भागांचा बाधित झालेला वीजपुरवठा रात्री उशिरापर्यंत सुरु करण्यात आला.



साधारणत: तासभर झालेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी वाहिन्यांवर झाडे पडली. तर काही ठिकाणी फिडर बॉक्स पाण्यात गेल्यामुळे वीज वाहिन्या बंद पडल्या. तर विजेच्या कडकडाटामुळेही काही ठिकाणी वीज वाहिन्या बाधित झाल्या. कोथरुड भागात कुंदननगरी फिडरवर विजेच्या कडकडाटामुळे ◀◀ पान २ वर

# अंजणगाव खेलोबामध्ये तणाव राज्यातून धनगर समाज एकवटला

**सोलापूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील माढा तालुक्यातील अंजणगावमध्ये खेलोबामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यावरून मोठा तणाव निर्माण झाला आहे. आंदोलकांनी ८ ते १० तास रस्ता रोको केल्यामुळे आणि दगडफेक झाल्यामुळे पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले. ग्रामस्थांनी आणि विविध संघटनांच्या कार्यकर्त्यांनी पुतळा हटवण्यास तीव्र विरोध केला आहे. ◀◀ पान २ वर



# राज्यातील शाळांची एकाच वेळी पटपडताळणी

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील शाळांची नियतकालिक मूल्यांकन चाचणीदरम्यान पटपडताळणी करण्यात येणार आहे. त्यानुसार ११ एप्रिल, १५ एप्रिल आणि २२ एप्रिल या दिवशी शिक्षण विभागाचे पथक शाळांना भेट देऊन विद्यार्थी उपस्थितीचा आढावा ◀◀ पान २ वर



# इंडिया स्किल्स स्पर्धेत महाराष्ट्राची दमदार कामगिरी




## ४ सुवर्ण पदकांसह एकूण १७ पदकं ; मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याकडून कौतुक

**मुंबई । प्रतिनिधी**

'वर्ल्ड स्किल्स' स्पर्धेसाठी रंगीत तालीम मानल्या जाणाऱ्या 'इंडिया स्किल्स २०२५–२६' स्पर्धेत महाराष्ट्रातील स्पर्धकांनी ४ सुवर्ण, ८ रौप्य आणि ५ कांस्य पदकांची अशी एकूण १७ पदके प्राप्त केली आहेत. उत्तर प्रदेश येथे ग्रेटर नोएडा मधील इंडिया एक्स्पो सेंटर अँड मार्ट येथे ही स्पर्धा पार पडली. आगामी २०२७–२०२८ ची ही स्पर्धा मुंबईत होण्यासाठी शिफारस करण्यात आली आहे या यशाबद्दल राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी संपूर्ण चमूचे आणि विजेत्या खेळाडूंचे मनापासून अभिनंदन केले आहे.

मंत्री मंगलप्रभात ◀◀ पान २ वर

# 'एमपीएससी'ची भरती प्रक्रिया जलद गतीने होणार –मुख्यमंत्री

**नागपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात २०२६ मध्ये




७०,००० हून अधिक सरकारी पदांची मेगा भरती होणार असून यामध्ये पोलिस, तलाठी, आणि शिक्षकांसह इतर अनेक विभागांतील रिक्त पदे भरली जाणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भरती प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश दिले असून २०,००० पदे एमपीएससीद्वारे भरली जातील. मात्र भरती प्रक्रिया राबवण्यास अनेकदा अडचणी येतात तसेच राज्य सरकारच्या विविध विभागाकडून मागणी पत्र देण्यामध्येही ◀◀ पान २ वर

# तर सरकारकडून २ लाख कोटीचे मदत पॅकेज



## मोदी सरकारची मोठी तयारी; युद्धाचा परिणाम सोसाव्या लागणाऱ्या क्षेत्रांना मोठा दिलासा

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

मध्यपूर्वेतील वाढत्या तणावामुळे आणि इराण–इस्रायल, अमेरिका युद्धाच्या जागतिक अर्थव्यवस्थेवरील परिणामांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार सतर्क झाले आहे. या युद्धाचा फटका भारतीय उद्योगांना बसू नये, यासाठी केंद्र सरकार एका भव्य आर्थिक मदत पॅकेजची घोषणा करण्याच्या तयारीत आहे. वित्त मंत्रालय सुमारे २ लाख कोटी रुपयांच्या क्रेडिट सपोर्ट स्कीमवर (पत साहाय्य योजना) वेगाने काम करत असून, या माध्यमातून युद्धग्रस्त परिस्थितीचा परिणाम सोसाव्या लागणाऱ्या क्षेत्रांना मोठा दिलासा दिला जाणार आहे.

प्रस्तावित योजना ही कोरोना महामारीच्या काळात लागू करण्यात आलेल्या इमरजेंसी क्रेडिट लाइन गॅरंटी स्कीमच्या धर्तीवर आधारलेली असल्याचे समजते. वित्त मंत्रालयांतर्गत असलेला वित्तीय सेवा विभाग या योजनेला अंतिम स्वरूप देत असून, येत्या १५ दिवसांत या योजनेची अधिकृत ◀◀ पान २ वर

# बारामती पोटनिवडणुकीत काँग्रेस उमेदवार देणार

### बिनविरोध निवडणुकीची शक्यता मोडली

लोकप्रतिनिधीच्या निधनानंतर पोटनिवडणूक लागली आणि दिवंगत व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्यालाच उमेदवारी दिली, तर बिनविरोध निवडणूक करण्याची राजकीय संस्कृती महाराष्ट्रात जपली जात होती. मात्र गेल्या काळात या परंपरेला छेद दिल्याचे चित्र काही ठिकाणी पाहायला मिळाले आहे. सुनेत्रा पवार यांच्याविरोधात बालेकिल्ला बारामतीतच शड्डू ठोकून काँग्रेसने मोठे धाडस दाखवले आहे.

**बारामती । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्रिपदावर असताना बारामती येथे झालेल्या विमान अपघातात ज्येष्ठ नेते अजित पवार यांचे निधन झाले. त्यामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. मात्र ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता आता कमी झाली आहे. कारण काँग्रेस पक्षाने बारामतीसोबतच राहुरी या विधानसभा मतदारसंघातही पोटनिवडणुका लढवण्याचा निर्णय घेतला आहे. या भूमिकेला पक्षश्रेष्ठींनी गुरुवारी मंजुरी



दिल्याची माहिती समोर येत आहे.

बारामती आणि राहुरी या विधानसभा मतदारसंघांसाठी २३ एप्रिल रोजी मतदान होणार असून, ४ मे रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली. यापूर्वी त्या राज्यसभेच्या खासदारपदी विराजमान झाल्या. मात्र महाराष्ट्राचं उपमुख्यमंत्रिपद भूषवताना राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा देऊन विधानसभा किंवा विधान परिषदेचे सदस्यत्व घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे त्या अजित दादांच्या बारामतीतून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. दरम्यान, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीत बारामती आणि राहुरी या दोन्ही जागा शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीने लढवल्या होत्या. बारामतीत सुनेत्रा पवार उमेदवारी करत असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### मराठवाड्यात गॅसचा काळा बाजार

**छत्रपती संभाजीनगर :** येथील समृद्धी महामार्गावर मध्यरात्री मोठी कारवाई करत दोन एलपीजी गॅस टँकर जप्त करण्यात आले आहेत. या टँकरमधील गॅस काळ्या बाजारात विकला जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

गुरूवारी उशिरा रात्री समृद्धी महामार्गावर तपासणीदरम्यान अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली. दोन संशयास्पद टँकरची तपासणी करण्यात आली. या तपासणीत मोठ्या प्रमाणावर एलपीजी गॅसचा साठा आढळून आला. हा गॅस व्यावसायिक सिलिंडरमध्ये भरून विक्रीसाठी वापरला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर अधिका–यांनी तात्काळ टँकर ताब्यात घेतले.या प्रकरणाबाबत माहिती देताना विभागाचे अधिकारी चंद्रकांत डांगे यांनी सांगितले की, या टँकरमधील गॅस व्यावसायिक सिलिंडरमध्ये भरून काळ्या बाजारात विकला जात होता.

### डॉ.चेरुकुमल्ली श्रीनिवास राव यांना स्वामीनाथन पुरस्कार

**दिल्ली :** हवामान अनुकूल शेती आणि नैसर्गिक शेती व्यवस्थापनासाठी डॉ.चेरुकुमल्ली श्रीनिवास राव यांना २०२४–२५ चा एम.एस स्वामीनाथन पुरस्कार जाहीर झाला आहे. डॉ. श्रीनिवास राव भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या (आयसीएआर) दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन संस्थेचे संचालक–कुलगुरू आहेत. शेती क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानासाठी त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. डॉ. श्रीनिवास राव यांना हैद्राबाद येथे १८ एप्रिल रोजी पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सोन्याचे पदक, प्रशस्तिपत्र आणि रोख रक्कम २ लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.कृषी क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या वैज्ञानिकांना अन्नसुरक्षेतील परिवर्तनकारी प्रभावासाठी पुरस्कार दिला जातो. या पुरस्काराची सुरुवात निवृत्त आयसीएआर कर्मचारी संघटना आणि नुझिवीडू सीड्स लिमिटेड यांच्याकडून २००४–०५ पासून करण्यात आली आहे.

### पोउपनि शारीरिक चाचणीचा सुधारित कार्यक्रम जाहीर

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा–२०२३ या परीक्षेत शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची चाचणी पूर्वी प्रशासकीय कारणास्तव पुढे ढकलण्यात आली होती. आता सुधारित कार्यक्रमानुसार ही शारीरिक चाचणी १५ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत घेण्यात येणार आहे. पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा–२०२३ या परीक्षेचा निकाल ९ मे २०२५ रोजी जाहीर करण्यात आला होता.परीक्षेत शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची चाचणी पूर्वी प्रशासकीय कारणास्तव पुढे ढकलण्यात आली होती.

आता सुधारित कार्यक्रमानुसार ही शारीरिक चाचणी १५ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत घेण्यात येणार आहे. चाचणी नवी मुंबई येथील पोलीस मुख्यालय, रोडपाली, सेक्टर १७, कळंबोली येथे पार पडणार असून ती डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित प्रणालीद्वारे घेतली जाणार आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**
**बीड, दि.३० मार्च २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २५६.०० क्विंटल | १,९२३ | २,६०१ | २,२४४ |
| ज्वारी/हायब्रिड: १६१.५० क्विंटल | १,७०० | ४,२०० | ३,२१७ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १.०० क्विंटल | ६,५०० | ७,००० | ६,७५० |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी:५५.०० क्विंटल | २,४०० | २,७५० | २,६३९ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा: २१.०० क्विंटल | ४,९०० | ५,०५० | ४,९९८ |

cmyk

अग्रलेख

# जनगणना २०२६ : बदलत्या भारताला समजून घेण्यासाठी...

देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रवासाला दिशा देणाऱ्या सर्वात महत्त्वाच्या प्रक्रियांपैकी एक असलेल्या जनगणनेची मोहीम अखेर १ एप्रिल २०२६ पासून सुरु झाली आहे. तब्बल १५ वर्षांच्या अंतरानंतर सुरु झालेली ही जनगणना केवळ आकड्यांची मोजदाद नसून भारताच्या बदलत्या वास्तवाचे प्रतिबिंब दाखवणारा आरसा आहे. त्यामुळेच या मोहिमेकडे केवळ प्रशासकीय उपक्रम म्हणून नव्हे, तर राष्ट्रीय बांधिलकी म्हणून पाहणे गरजेचे आहे.भारतामध्ये जनगणनेचा इतिहास दीडशे वर्षांहून अधिक जुना आहे. ब्रिटिश काळात सुरु झालेली ही प्रक्रिया सुरुवातीला सत्ताधाऱ्यांच्या सोयीसाठी होती. त्या काळातील माहिती संकलन इंग्रजांच्या प्रशासनाला पूरक ठरेल अशा पद्धतीने केले जात होते. स्वातंत्र्यानंतर मात्र जनगणनेचा उद्देश बदलला. देशातील लोकसंख्येचे स्वरूप, त्यांच्या गरजा, सामाजिक रचना आणि आर्थिक स्थिती यांचा अभ्यास करून विकासाच्या धोरणांची आखणी करण्यासाठी जनगणना अत्यावश्यक ठरली.

२०११ मध्ये झालेली शेवटची जनगणना आजही अनेक सरकारी योजनांचा पाया आहे. परंतु गेल्या १५ वर्षांत भारतात मोठ्या प्रमाणावर बदल झाले आहेत. लोकसंख्या वाढ, शहरीकरणाचा वेग, शिक्षणाचे प्रमाण, रोजगाराच्या संधी, स्थलांतर, डिजिटल क्रांती यांसारख्या अनेक घटकांनी देशाचे स्वरूप बदलून टाकले आहे. अशा परिस्थितीत अद्ययावत आणि अचूक माहितीशिवाय धोरणे ठरवणे म्हणजे अंधारात बाण मारण्यासारखे आहे. त्यामुळे २०२६ ची जनगणना अत्यंत महत्त्वाची ठरते. कोविड महामारीमुळे २०२१ ची जनगणना पुढे ढकलावी लागली होती. या विलंबामुळे निर्माण झालेली माहितीची दरी आता भरून काढण्याची संधी या मोहिमेमुळे मिळणार आहे. विशेष म्हणजे यावेळी प्रथमच जनगणना दोन टप्प्यांत केली जात आहे. स्वयंगणना हा पहिला टप्पा नागरिकांना अधिक सक्रिय भूमिका देणारा आहे. डिजिटल माध्यमातून स्वतःची माहिती नोंदवण्याची संधी मिळाल्यामुळे पारदर्शकता आणि अचूकता वाढवण्याची अपेक्षा आहे. त्यानंतर अधिकृत अधिकारी घरोघरी जाऊन माहिती पडताळून पाहणार आहेत. या जनगणनेत विचारले जाणारे ३६ प्रश्न केवळ वैयक्तिक माहितीपुरते मर्यादित नाहीत, तर ते नागरिकांच्या जीवनशैली, शिक्षण, रोजगार, निवास, सुविधांचा वापर, तसेच सामाजिक रचनेबद्दल सखोल चित्र उभे करणार आहेत. विशेष म्हणजे जातीआधारित लोकसंख्येची माहितीही यामध्ये समोर येणार असल्याने सामाजिक न्याय आणि संसाधनांचे योग्य वाटप यासाठी हा डेटा निर्णायक ठरू शकतो. भारत हा 'युवा देश' आहे आणि शहरीकरण वेगाने वाढत आहे, असे अनेकदा सांगितले जाते. परंतु या दाव्यांमागील वास्तव काय आहे, हे जनगणनेच्या निष्कर्षांनंतरच स्पष्ट होईल. बेरोजगारी, शिक्षणातील असमानता, ग्रामीण–शहरी दरी, स्थलांतर यांसारख्या मुद्द्यांवर ठोस धोरणे आखण्यासाठी ही माहिती अत्यावश्यक आहे. सरकारच्या विविध योजनाअन्नसुरक्षा, आरोग्य, शिक्षण, गृहनिर्माणया सर्वांची दिशा जनगणनेच्या आकडेवारीवरच ठरते. मात्र या संपूर्ण प्रक्रियेत सर्वात महत्त्वाची भूमिका नागरिकांची आहे. जनगणनेदरम्यान विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांना प्रामाणिक आणि अचूक उत्तरे देणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. काही वेळा खासगी माहिती विचारली जात असल्याने शंका किंवा भीती निर्माण होऊ शकते. परंतु ही माहिती केवळ धोरणात्मक नियोजनासाठी वापरली जाते, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. चुकीची किंवा अपूर्ण माहिती दिल्यास त्यावर आधारित धोरणेही चुकीची ठरू शकतात आणि त्याचा फटका शेवटी नागरिकांनाच बसतो.

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडियाच्या माध्यमातून अफवा आणि गैरसमज जलद पसरतात. जनगणनेबाबतही अशा चुकीच्या माहितीचा प्रसार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अधिकृत स्त्रोतांवर विश्वास ठेवणे आणि अशा अफवांना बळी न पडणे गरजेचे आहे. शासनाकडून करण्यात येणारे प्रबोधन आणि जनजागृती यांचा लाभ घेत नागरिकांनी या मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद द्यायला हवा.जनगणना ही केवळ आकडेवारी गोळा करण्याची प्रक्रिया नसून ती देशाच्या भविष्यासाठी मार्गदर्शक असते. सरकार, विरोधी पक्ष, सामाजिक संघटना आणि सर्वसामान्य नागरिकया सर्वांनी मिळून या मोहिमेला सहकार्य केल्यासच खऱ्या अर्थाने विश्वासार्ह आणि उपयुक्त डेटा तयार होऊ शकतो. त्या आधारेच समतोल, समावेशक आणि परिणामकारक धोरणे आखली जाऊ शकतात. बदलत्या भारताला समजून घेण्यासाठी आणि उद्याच्या भारताची दिशा ठरवण्यासाठी जनगणना २०२६ ही एक ऐतिहासिक संधी आहे. या संधीचा योग्य उपयोग करून देशाच्या विकासाला गती देणे हे आपल्या सर्वांच्या हातात आहे. त्यामुळे जनगणनेत सहभाग घेणे, सत्य माहिती देणे आणि या प्रक्रियेला पाठिंबा देणे हे प्रत्येक भारतीयाचे केवळ कर्तव्यच नाही, तर देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यक योगदान आहे.

# लोकमतच्या मराठवाडा गौरव पुरस्काराने कृषीभूषण महेश बेदरे सन्मानित

गेवराई । प्रतिनिधी

मराठवाड्यामध्ये गेल्या अठरा वर्षापासून कृषी क्षेत्रामध्ये अविरतपणे कार्य करणारे गेवराई येथील कृषीभूषण महेश बेदरे यांना लोकमत वृत्तपत्र समूहाच्या वतीने मराठवाडा गौरव मराठवाडा भूषण २०२६ पुरस्काराने संभाजीनगर येथे कार्यक्रमांमध्ये माजी मंत्री राजेंद्र दर्डा यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले




## कृषी क्षेत्रातील कार्याचा येतोचित सन्मान

वयाच्या सतरा वर्षापासून विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणारे महेश बेदरे यांना राज्य शासनाचा कृषिभूषण, विविध संस्थांच्या वतीने कृषिरत्न, आता लोकमत वृत्तपत्राच्या वतीने मराठवाडा स्तरावरील मराठवाडा गौरव मराठवाडा भूषण हा पुरस्कार देऊन बीड जिल्ह्याच्या शिरपेचात महेश बेदरे यांच्या माध्यमातून तुरा रोवला आहे मराठवाड्यामध्ये कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून लाखो शेतकऱ्यांना नव आधुनिक तंत्रज्ञान बरोबर कृषी, सामाजिक, सहकार, राजकीय कार्यामध्ये अग्रेसर असणारे महेश गणेशराव बेदरे अखंडपणे सेवार्थ असतात याच कार्याची दखल घेऊन लोकमत वृत्तपत्रासमूहने दिनांक ३१ मार्च रविवार रोजी राज्याचे माजी मंत्री तथा लोकमत वृत्तपत्र समूहाचे चीफ संपादक राजेंद्र बाबू दर्डा यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. महेश बेदरे हे किसान कृषी विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून मराठवाड्यातील हिंगोली,परभणी, जालना,बीड, गेवराई या ठिकाणी शेतकऱ्यांसाठी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन करतात त्याचबरोबर किसान अर्बन क्रेडिट सोसायटीच्या माध्यमातून सहकार क्षेत्रामध्ये ही त्यांचे भरीव योगदान असून त्याचबरोबर राजकीय क्षेत्रातील काँग्रेस पक्षाचे ते तालुकाध्यक्ष आहेत या मिळालेल्या पुरस्काराबद्दल राज्यभरातून त्यांच्यावर मान्यवरांनी शुभेच्छाचा वर्षाव केला आहे.

# मानवी जीवनाच्या कल्याणासाठी संताचे कार्य केले- महादेव महाराज चाकरवाडीकर

बीड । प्रतिनिधी

संताचे कार्य सर्वश्रेष्ठ आहे. संत हे जगाच्या कार्य करतात. संताचे आपल्यावर मोठे उपकार आहेत. देव आणि संत एकाच नाण्याच्या बाजू आहेत. संताच्या सहवासात राहिल्यास मानवी जीवनाचे कल्याण होते असे प्रतिपादन ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांनी केली.



बीड शहरातील राधाकृष्णनगरी येथे शिव समर्थ दक्षिणमुखी हनुमान मंदिर व नवग्रह मंदिरात हनुमान जन्मोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या काल्याच्या कीर्तनात महादेव महाराज चाकरवाडीकर बोलत होते.

याप्रसंगी कीर्तनात पुढे बोलताना महादेव महाराज म्हणाले, साधू, संत आणि भगवान परमात्म्याच्या संगतीने सानिध्यात कल्याण होते. जीवन मुक्तीचे सुख प्राप्त झाले. व्यवहारी जीवनात चिंता असते. चिता मानसिक विकृती आहे. माणसाने जीवनात निश्चिंत असावे.

'आपला तो एक देव करून घ्यावा' या जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या अभंगावर बोलतांना ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांनी भाविकांना मंत्रमुग्ध करणारे निरूपण केले.

जगाच्या बाजारात सर्व मिळेल. प्रेम मिळत नाही. भगवान परमात्म्यारखे कोणीच प्रेम करत नाही. आत्मा सत्य, अविनाशी आहे. आत्म्यावर प्रेम करावे, असे सांगून श्रीकृष्ण, गवळीच्या क्रीडा, लीलांचे सुंदर वर्णन केले. विविध दृष्टांत देऊन कृष्णाच्या आणि सवंगडच्याच्या काला सांगितला. काल्याच्या कीर्तनात महादेव महाराज चाकरवाडीकर सामाजिक स्थितीवर भाष्य केले. काल्याच्या कीर्तनात कीर्तन कार्यक्रमात गायनाचार्य माऊली मारकड भुसारी महाराज, मनोज बोठे, मृदंगाचार्य लष्करे महाराज यांनी साथसांगत केली.

पान ६ वरून...

## श्री गजानन नागरी सहकारी

असून नेटवर्थमध्ये १५.०१ टक्क्यांची वाढ होत ती २,२५४.९० लाखांवर गेली आहे. त्यामुळे बँकेचे आर्थिक स्थैर्य अधिक बळकट झाले आहे. एनपीए नियंत्रणातही बँकेने प्रभावी कामगिरी केली आहे. ग्रॉस एनपीए ३.०५ टक्क्यांवरून २.७२ टक्क्यांवर आणण्यात यश आले असून नेट एनपीए शून्य टक्के राखण्यात आले आहे.भाग भांडवलात १३.८९ टक्क्यांची वाढ झाली असून प्रति कर्मचारी व्यवसाय १४.०३ टक्क्यांनी वाढून ८१९.५१ लाखांवर पोहोचला आहे. तसेच खेळते भांडवल २१.५२ टक्क्यांनी वाढले असून सीडी रेशो ६६.०८ टक्क्यांवर स्थिरावला आहे. विशेष म्हणजे बँकेवर कोणतेही थकित कर्ज नसल्याने पारदर्शकता आणि शिस्त यांचे उत्तम उदाहरण निर्माण झाले आहे.बँकेच्या या उल्लेखनीय यशामागे संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी वर्गाचे परिश्रम, समर्पण आणि कुशल नियोजन महत्त्वपूर्ण ठरले आहे. बँकेचे सीईओ, सरव्यवस्थापक, कर्जविभाग व कर्जवसुली अधिकारी यांनी अत्यंत काटेकोर धोरणे राबवत कर्जवाटप व वसुली प्रक्रियेत शिस्त राखली. ग्राहकाभिमुख सेवा, वेळेवर निर्णयक्षमता आणि पारदर्शक कामकाज यामुळे बँकेची विश्वासार्हता अधिक दृढ झाली आहे.कर्जवसुली अधिकाऱ्यांनी प्रभावी पाठपुरावा करून एनपीए नियंत्रणात ठेवण्यात मोठे योगदान दिले आहे, तर प्रशासनिक व वित्तीय व्यवस्थापनाने बँकेच्या सर्वांगीण प्रगतीस गती दिली आहे. प्रत्येक कर्मचारीने संस्थेच्या प्रगतीला स्वतःचे ध्येय मानून केलेल्या कार्यामुळेच बँक आज एका यशस्वी टप्प्यावर पोहोचली आहे.बँकेचे अध्यक्ष माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली तसेच उपाध्यक्ष जगदीश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली बँक बीड जिल्ह्यासह मराठवाडा प्रदेशात आर्थिक क्षेत्रात प्रभावी कामगिरी करत आहे.एकूणच स्थिरता आणि प्रगती यांचा समतोल साधत श्री गजानन नागरी सहकारी बँक लि.,बीड ही ग्राहकांचा विश्वास संपादन करत आर्थिक क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करत आहे.आगामी काळातही ही प्रगतीची घोडदौड अधिक वेगाने सुरू राहील,असा विश्वास व्यक्त होत आहे.

## परळी-मुंबईत रेल्वेसाठी

रेल्वे नकाशावर भक्कम स्थान मिळवून देण्यासाठी या मागण्या पूर्ण होणे आवश्यक आहे. या मागण्यांवर सकारात्मक विचार करून तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन मंत्र्यांकडून देण्यात आले आहे. या भेटीमुळे परळी-मुंबई रेल्वे प्रवासाच्या आशा पल्लवित झाल्या असून, लवकरच जिल्ह्याला आनंदाची बातमी मिळण्याची शक्यता आहे.

## बसस्थानकावर महिला प्रवाशाचे

गुन्हे नोंद आहेत. जप्त केलेले दागिने आणि आरोपी महिलेला पुढील कारवाईसाठी केज पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

यांनी केली कामगिरी

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, महेश जोगदंड, जफर पठाण, दिलीप गित्ते, स्वाती मुंढे आणि गणेश मराडे यांच्या पथकाने केली आहे.

## आगामी जि.प .निवडणुकीत

आणि प्रश्नांशी जोडलेली चळवळ असल्याचे सांगितले. संघटन वाढीसाठी युवकांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शिवसेनेच्या उपनेत्या माजी आमदार संगिताताई ठोंबरे यांनी मार्गदर्शन केले.यावेळी कार्यक्रमास विजयप्रकाश ठोंबरे साहेब, , पृथ्वीराज पाटील शिवसेना तालुकाप्रमुख केज, दादासाहेब ससाने विधानसभा प्रमुख केज, दत्तकुमार काकडे युवासेना तालुकाप्रमुख केज, चंद्रशेखर बाप्पा मुकदम ज्येष्ठ नेते, अभिमान बापू पटाईत ज्येष्ठ नेते, आदित्य रांजणकर शेतकरी सेना जिल्हा कार्याध्यक्ष बीड,जयाताई राऊत तालुकाप्रमुख महिला आघाडी, वैशालीताई सांगळे शहर प्रमुख महिला आघाडी, आम्रपाली गजेशिव, विकास काशीद शिवसेना तालुका सचिव, महेंद्र चाटे उपतालुकाप्रमुख, योगेश देशमुख उपतालुकाप्रमुख कैलास उगलमुगले उप तालुकाप्रमुख, सुग्रीव बसवर उपतालुकाप्रमुख, ज्ञानेश्वर भांगे युवासेना उपतालुकाप्रमुख, शिवाजी गायकवाड युवासेना व उपतालुका प्रमुख, किशोर थोरात माजी सरपंच कुंभेफळ, अशोक सक्राते, सुनील पटाईत, शुभम आप्पा गंभीरे ,श्रीराम कदम, शिवशंकर पाटील साबला ,अमोल वळसे पाटील, ज्येष्ठ नेते प्रकाश गुंड, विश्वास जाधव, राजेभाऊ जाधव, पृथ्वीराज इंगळे, दिलावर सिंग गोके, किसन दादा कदम यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान शिवसेनेच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला आणि भगव्याच्या साक्षीने कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला पोहोचला.

**कार्यकर्त्यांना ताकद देणे हेच आमचे उद्दीष्ट : मुळूक**

केज तालुक्यात शिवसेनेचे संघटन अधिक भक्कम करून प्रत्येक कार्यकर्त्याला ताकद देणे हेच आमचे उद्दिष्ट आहे. सर्वांनी एकजुटीने काम केल्यास आगामी काळात शिवसेना अधिक सक्षम होईल, असे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले. मुळूक यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात शिवसेनेची वाढ होत असून कार्यकर्त्यांमध्ये नवउत्साह निर्माण होत असल्याचे चित्र आहे.

## डिजिटल अरेस्ट करून

निष्पन्न होताच पोलिसांचे एक पथक तातडीने जळगावला रवाना झाले. पोलिसांनी तेथून प्रसन्न अजय कासट (३१), स्वाती प्रसन्न कासट (२६) आणि संकेत दीपक बेलदार (२२) या तिघांना ताब्यात घेतले.

करन्सी मार्केटच्या नावाखाली व्यवहार

हे आरोपी करन्सी मार्केटमध्ये ट्रेडिंग करून फसवणुकीचे पैसे स्वतःच्या फायद्यासाठी बँक खात्यावर घेत असल्याचे तपासात समोर आले आहे. मुख्य आरोपीने आपल्या पत्नीच्या बँक खात्यावर फसवणुकीची रक्कम वळवली होती. पोलिसांनी आरोपींकडून ३ लाख रुपये रोख जप्त केले असून, बँक खात्यावरील ३ लाख २० हजार रुपये गोठवले (फ्रीज) आहेत. न्यायालयाने आरोपींना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

''डिजिटल अरेस्ट'' अशी कोणतीही संकल्पना कायद्यात नाही. पोलीस असल्याचे सांगून कोणी व्हिडिओ कॉलद्वारे धमकावत असेल, तर त्यावर विश्वास ठेवू नका. अशी फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन बीड जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलेश केळे, सपोनि संदीप अराक आणि त्यांच्या पथकाने यशस्वीरित्या पूर्ण केली.

## माजलगावमध्ये धरण

असा अंदाज नागरिकांनी लावला,मात्र जवळ जाऊन पाहणी केली असता संबंधित इसम मृत असल्याचे लक्षात आले. या धक्कादायक प्रकारानंतर नागरिकांनी तातडीने माजलगाव शहर पोलिसांना घटनेची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेहाचा पंचनामा करून परिसराची पाहणी केली. मृताच्या अंगावर कोणत्याही खुणा आहेत का, तसेच जवळ काही वस्तू सापडतात का, याचा शोध घेण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला. मृत व्यक्तीचे वय साधारण ३० ते ३५ वर्षांच्या दरम्यान असून, अद्याप या व्यक्तीची ओळख पटलेली नाही.

## प्रा.डॉ.सारिका विश्वाबंर

महाराज मेंगडे,ह.भ.प.नाना महाराज कदम,व साखरे बोरगांव येथिल अग्नीशमन अधिकारी मा.शिवाजीराव झनझन,राम नाईकवाडे,विष्णु चव्हाण,सरपंच गजानन घरत,माजी सरपंच बाबासाहेब देवगुडे ,पोलीस पाटील तुकाराम घरत,सखाराम घरत,प्रा.डॉ.अशोक देवगुडे,प्रा.श्रीकृष्ण झनझन,रजनीकांत जाधव,दिलीप जाधव,नाना जाधव,बंडू जाधव,संभाजी जोगदंड आदिनी अभिनंदन केले आहे. त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

पान १ वरून...

## शिंदे, तटकरे, चंद्रकांत पाटील

चाकणकर यांचे खरात याच्याशी २३६ कॉल झालेले आहेत, अशी माहिती दमानिया यांनी शुक्रवारी (दि. ३) माध्यमांशी बोलताना दिली. या प्रकरणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नावही जोडले जात होते. सीडीआरनुसार त्यांचेही अशोक खरात यांच्याशी १७ कॉल झालेले आहेत. या १७ कॉलपैकी १० इनकमिंग आणि ७ आउटगोइंग कॉल आहेत. सर्वाधिक संभाषण २१ मिनिटांचे झालेले आहे. जर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अशा व्यक्तीशी १७ वेळा बोलत असतील, तर ते कशासाठी याचे उत्तर त्यांनी देणे गरजेचे आहे, असे दमानिया यांनी यांनी म्हटले आहे. तसेच, भाजपचे चंद्रकांत पाटील यांनी अशोक खरात यांना ८ वेळा कॉल केले आहेत. राष्ट्रवादीचे सुनील तटकरे यांनीही ८ कॉल केले आहेत, तसेच भाजपचे आशिष शेलार यांचाही एक कॉल त्यांना गेलेला आहे. ही फक्त नॉर्मल कॉलची माहिती आहे. व्हॉट्सॲप कॉलची माहिती उपलब्ध नाही. जर नॉर्मल कॉल इतके झाले असतील, तर व्हॉट्सॲप कॉल किती झाले असतील याची कल्पनाही करता येत नाही, असेही दमानिया यांनी म्हटले आहे. यापेक्षा धक्कादायक बाब म्हणजे खरात यांना राज्याबाहेरूनच नव्हे तर परदेशातूनही कॉल येत होते. कतार, यूएई, ऑस्ट्रेलिया आणि ओमान अशा देशांतूनही त्यांना फोन येत होते. ही सर्व माहिती एसआयटीकडे दिलेली आहे. आता या प्रकरणाची सखोल चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली आहे.

## राज्यातील अनेक

आकाशातील विजेला अटकाव करणारी यंत्रणा बाधित झाली. त्यामुळे संबंधित वाहिनीचा वीजपुरवठा ठप्प झाला होता. मात्र पर्यायी मार्गाने या भागातील वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला.नांदेड सिटी अतिउच्चदाब वाहिनीवर ट्रिपिंग आल्यामुळे अर्ध्या तासासाठी कोथरुड विभागातील वीजपुरवठा बाधित झाला होता. पाऊस थांबताच वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. शिवाजीनगर विभागातील विद्यापीठ, खडकी, बावधन, बाणेर, शिवाजी हाऊसिंग सोसायटी या वाहिन्यांचा वीजपुरवठा बाधित झाला असून विद्यापीठ वाहिनी सुरु करण्यात यश मिळाले. पर्वती या भागातील महावितरणच्या जुन्या पर्वती वीज उपकेंद्रातील फिडरवर झाड पडले होते. त्याला हटवून वीजपुरवठा सुरु करण्याचे काम उशिरापर्यंत सुरु होते. तर प्रयेजा व मधुकोश वाहिनीच्या इनकमिंग फिडर बॉक्स भागात पाणी साचल्याने वीजपुरवठा बंद झाला होता. खडकवासला, श्रवण वाहिनीच्या पेट्रोलिंगचे काम हाती घेण्यात आले होते. बंडगार्डन विभागात वडाचीवाडी या उपरी वीज वाहिनीवर झाडाच्या फांद्या पडल्याने त्या भागातील वीजग्राहकांचा वीजपुरवठा बंद झाला. तर वाडिया वाहिनीला तासाभरातच पर्यायी मार्गाने सुरु करण्यात आले.

## बारामती पोटनिवडणुकीत

पवार पक्षाने त्यांना पाठिंबा जाहीर केला आहे. अद्याप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची भूमिका समोर आली नाही. परंतु वंचित बहुजन आघाडी आणि राष्ट्रीय समाज पक्ष काँग्रेसला पाठिंबा देण्याचे संकेत आहेत.बारामतीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून येत्या ६ एप्रिल रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सुनेत्रा पवार आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

## राज्यातील शाळांची

घेऊन त्याची प्रणालीमध्ये नोंद करणार आहे. पटपडताळणीची प्रक्रिया एकाच वेळी पूर्ण करण्यासाठी नववी आणि अकरावीच्या परीक्षाही याच दिवशी आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी या बाबत परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेतर्फे राज्यातील शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खासगी अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांसाठी नियतकालिक मूल्यांकन चाचणी घेतली जाणार आहे. त्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार दुसरी ते आठवी या इयत्तांची ११ एप्रिल, १५ एप्रिल आणि २२ एप्रिल रोजी अनुक्रमे प्रथम भाषा, गणित आणि तृतीय भाषा या विषयाची परीक्षा घेतली जाणार आहे. याच काळात आता शाळांमध्ये पटपडताळणी प्रक्रियाही राबवली जाणार आहे.या पार्श्वभूमीवर परिपत्रकाद्वारे दिलेल्या सूचनांनुसार, इयत्ता दुसरी ते आठवीच्या वर्गाची पटपडताळणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने आयोजित केलेल्या पॅट परीक्षेच्या दिवशी म्हणजेच ११ एप्रिल, १५ एप्रिल, २२ एप्रिल रोजी करावी. इयत्ता नववीची मराठी, गणित आणि इंग्रजी या विषयांची वार्षिक परीक्षा ११ एप्रिल, १५ एप्रिल, २२ एप्रिल रोजी आयोजित करावी. इयत्ता अकरावीची मराठी, भौतिकशास्त्र, इंग्रजी या विषयांची वार्षिक परीक्षाही याच दिवशी आयोजित करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यातील शाळा पटपडताळणीच्या अनुषंगाने 'स्टुडंट पोर्टल'वर मुख्याध्यापक लॉगिन, केंद्रप्रमुख लॉगिन, विस्तार अधिकारी लॉगिन, शिक्षणाधिकारी लॉगिनवर सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. पटपडताळणीसाठी शाळेला भेट देणारे पथक या लॉगिनचा वापर करून उपस्थित आणि अनुपस्थित विद्यार्थ्यांची नोंद करतील.

## अंजणगाव खेलोबामध्ये

शुक्रवारी (३ एप्रिल) दुसऱ्या दिवशी सुद्धा तणाव कायम होता. दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा सन्मानाने काढावा आणि तो शासनाच्या किंवा ज्यांनी हा पुतळा बसवला आहे त्यांच्या जागेमध्ये उभा करून त्या ठिकाणी शिवसृष्टी करावी, अशी मागणी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी केली आहे. प्रशासनाने हा पुतळा सन्मानाने हलवावा असेही हाके यांनी म्हटले आहे. दरम्यान, पोलीस उप अधीक्षक बसवराज शिवपुजे, पोलीस निरीक्षक संजय जगताप आणि इतर पोलिस अधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणावर गुलाब पुष्प अर्पण करत अभिवादन केले. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी आंदोलकांशी चर्चा करून वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. जमावाकडून दगडफेक झाल्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला. यामध्ये काही पोलीस आणि आंदोलक जखमी झाले. गावात सध्या मोठ्या प्रमाणावर पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला असून, शांतता राखण्याचे आवाहन केले जात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यावरून आणि तो तिथून हलवण्याच्या प्रशासनाच्या निर्णयावरून सुरू झाला आहे. अंजणगाव येथे खिलोबा मंदिरासमोर रात्रीतून महाराजांचा पुतळा बसवण्यात आला होता. प्रशासनाने हा पुतळा तिथून हलवण्याचा निर्णय घेतल्यामुळे आंदोलक आक्रमक झाले. दरम्यान ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी आरोप केला आहे की, स्थानिक आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्तक्षेपामुळे दोन समाजांत तेढ निर्माण झाली असून, या वादाला जातीय वळण मिळाले आहे. आमदार अभिजीत पाटील विरुद्ध लक्ष्मण हाके यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. हाके यांनी या वादाला आमदारांनी पेटवलेली आग म्हटले आहे. बाळराजे आवारे-पाटील यांनी हाके यांच्यावर समाजात भांडणे लावल्याचा आरोप केला. पुतळा काढल्याशिवाय हटणार नाही, अशी भूमिका लक्ष्मण हाके आणि त्यांच्या समर्थकांनी घेतली आहे. ही जागा जरी मंदिराची नसली तरी तिथे महाराजांचा पुतळा सुरक्षित आहे, त्यामुळे त्याला विरोध करू नये, असे बाळराजे आवारे-पाटील यांनी म्हटले आहे.

## तर सरकारकडून २ लाख

अंमलबजावणी होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश विस्कळीत झालेली पुरवठा साखळी आणि वाढती जागतिक अनिश्चितता यांमुळे संकटात सापडलेल्या उद्योगांना आर्थिक आधार देणे हा आहे. या योजनेचा सर्वाधिक लाभ सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना मिळण्याची चिन्हे आहेत. जागतिक अस्थिरतेमुळे आणि वाहतुकीच्या मार्गांमधील अडथळ्यांमुळे या क्षेत्रावर मोठा परिणाम झाला आहे. नवीन योजनेअंतर्गत उद्योजकांना विनाहमी कर्ज उपलब्ध करून दिले जाईल, ज्याला खुद्द सरकारची हमी असेल. यामुळे बँकांकडून कर्ज मिळणे सुलभ होईल आणि बाजारातील रोख तरलतेची समस्या दूर होण्यास मदत होईल. सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या भारतीय अर्थव्यवस्थेवर कोणताही तातडीचा किंवा प्रणालीगत दबाव नाही. मात्र, भविष्यात परिस्थिती अधिक बिकट झाल्यास अर्थव्यवस्था कोलमडू नये, यासाठी सरकारने सावधगिरीचा उपाय म्हणून हे पाऊल उचलले आहे. गरज पडल्यास प्रभावित क्षेत्रांना त्वरित मदतीचा हात मिळावा, ही सरकारची यामागची प्राथमिक रणनीती आहे.

## 'एमपीएससी'ची भरती

प्रचंड विलंब होतो. त्यामुळे राज्य सरकारने एमपीएससीची भरती प्रक्रिया जलद गतीने घेण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतलेला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला (एमपीएससी) बळकट करण्याचे आश्वासन दिले खरे परंतु, सातत्याने रखडत चाललेले निकाल, परीक्षा, निवड प्रक्रिया आणि आरक्षणाच्या गोंधळामुळे राज्यातील स्पर्धा परीक्षार्थी चिंताग्रस्त झाला आहे. मात्र, आयोगाने यावर उपाय शोधला आहे. सरकारने तीन सदस्यांची नियुक्ती केली असून यामुळे एमपीएससी बळकट होणार आहे. तसेच निकाल आणि नियुक्तीच्या प्रक्रियेला गती येण्याची शक्यता व्यक्त केली जाते. राजीव निवतकर, दिलीप भुजबळ आणि महेंद्र वारभुवन यांची नियुक्ती केली होती.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) माध्यमातून राज्यसेवेत अधिकारी होण्याचे स्वप्न पाहणा-या युवकांना न्याय देण्यासाठी 'एमपीएससी'च्या तीन रिक्त सदस्यपदांवरील नियुक्ती तातडीने करण्यात यावी, अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून करण्यात आली होती.

**मुख्यमंत्र्यांनी दिले होते आश्वासन**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमपीएससीला बळकट करण्यासंदर्भात आश्वासन दिले होते. त्यानुसार त्यांनी आता भरती प्रक्रियेला जलद गती देण्यासाठी महत्त्वाचे बैठक बोलावली आहे. या बैठकीमध्ये मागणी पत्र तात्काळ कसे पाठवता येतील आणि भरती प्रक्रिया जलद गतीने कशी पार पाडता येईल या संदर्भात चर्चा होणार आहे.

## इंडिया स्किल्स स्पर्धेत

लोढा म्हणाले की, केंद्रीय कौशल्य विकास मंत्री जयंत चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थ्यांचा गुण गौरव समारंभ पार पडला आहे.महाराष्ट्रातील तरुणांमध्ये अफाट कौशल्य आहे, हे या निकालाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. जागतिक स्तरावर भारताचे नेतृत्व करण्याची क्षमता आपल्या तरुणांमध्ये आहे. पदके जिंकणाऱ्या सर्व उमेदवारांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या संस्थांचे मी अभिनंदन करतो. आगामी वर्ल्ड स्किल्स स्पर्धेतही महाराष्ट्र अशीच उत्तुंग कामगिरी करेल, याची मला खात्री आहे.महाराष्ट्र २०२७ मध्ये राज्यस्तरीय महिला कौशल्य चॅम्पियन्स ही स्पर्धा सुरू करणार आहे. कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था आणि व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ,उद्योग भागीदार व तांत्रिक संस्था यांनी हे यश मिळवण्यासाठी गेल्या वर्षभरापासून विशेष मेहनत घेतली होती. सुमारे १५,२७५ नोंदणीकृत उमेदवारांमधून जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावरील चाळणी परीक्षेतून ५४ सर्वोत्तम उमेदवारांची राष्ट्रीय स्तरासाठी निवड करण्यात आली होती. स्पर्धेपूर्वी या उमेदवारांना तज्ज्ञांमार्फत विशेष 'बूटकॅम्प' प्रशिक्षण आणि मानसिक तयारीसाठी समुपदेशनही देण्यात आले होते. इंडिया स्किल्स स्पर्धेतील या विजयामुळे महाराष्ट्रातील यशस्वी उमेदवारांना आता आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. २०२६ मध्ये चीनमधील शांघाय येथे सप्टेंबर मध्ये होणाऱ्या 'वर्ल्ड स्किल्स' स्पर्धेसाठी आता या विजेत्यांच्या प्रशिक्षणाची पुढील फेरी लवकरच सुरू होणार आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि.४ एप्रिल २०२६



# सिग्नल प्रकरणात कारवाई, पण १३ कोटींच्या बसस्थानक गळतीकडे दुर्लक्ष

## दुहेरी मापदंड जिल्हाधिकाऱ्यांचा 'विवेक' कधी जागा होणार? ; कंत्राटदारावर कधी गुन्हे दाखल करणार?- डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

शहरातील ६४ लाख रुपये खर्चाच्या हायटेक सिग्नल कोसळल्याप्रकरणी संबंधित कंत्राटदारावर गुन्हे दाखल करण्याचे आदेश जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांनी दिले असतानाच, १३ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या बसस्थानकाच्या गळती प्रकरणी अद्याप कोणतीही कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या दुहेरी मापदंडाबद्दल डॉ.गणेश ढवळे यांनी तिव्र नापसंती व्यक्त केली आहे. संबंधित प्रकरणात कंत्राटदारांवर गुन्हे दाखल करून संबंधित आगार व बस व्यास्थापन आधिका-यांवर दंडात्मक व प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी मागणी मुख्यमंत्री, पालकमंत्री, परिवहन मंत्री, जिल्हाधिकारी बीड यांना डॉ.गणेश ढवळे यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

नगर नाका परिसरात अवकाळी पावसात सिग्नल कोसळल्याच्या घटनेनंतर सामाजिक कार्यकर्ते व काही नगरसेवकांच्या तक्रारीनंतर जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले. मात्र, याच शहरातील मुख्य बसस्थानकाच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे उद्घाटनापूर्वीच गळती सुरू झाल्याच्या तक्रारीकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केला आहे. डॉ. गणेश ढवळे यांनी सुमारे पाच महिन्यांपूर्वी, १ नोव्हेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्री व परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे लेखी तक्रार केली होती. या तक्रारीनंतर संबंधित विभागाकडून जिल्हाधिकाऱ्यांना चौकशी व कारवाईचे निर्देशही देण्यात आले होते. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.

''सिग्नल कोसळल्यावर तत्काळ गुन्हे दाखल करण्याचे आदेश देणारे जिल्हाधिकारी बसस्थानक गळती प्रकरणात मौन का बाळगतात? त्यांचा 'विवेक' कधी जागा होणार?'' असा सवाल डॉ. ढवळे यांनी उपस्थित केला आहे. तसेच संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करत सोमवारपासून आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे. बसस्थानकाच्या निकृष्ट कामाबाबत करण्यात आलेल्या तक्रारीनंतर मुख्यमंत्री कार्यालय तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडूनही कारवाईचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, जिल्हा प्रशासनाने या आदेशांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात येत आहे. बसस्थानकाच्या निकृष्ट कामाबाबत तक्रारी असूनही विभाग नियंत्रक अनुजा दुसाने आणि आगार व्यवस्थापक निलेश पवार या संबंधित अधिकाऱ्यांनी कंत्राटदाराला पाठीशी घालत कोणतीही कठोर कारवाई केली नाही, असा आरोपही करण्यात आला आहे. ''काम अपूर्ण असून दुरुस्ती केली जाईल'' असे कारण देत प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा दावा डॉ. ढवळे यांनी केला आहे. बसस्थानक प्रकरणी दोषींवर गुन्हे दाखल करण्यात यावेत यासाठी दि.६ सोमवार रोजी आंदोलनाचा इशारा देण्यात आला असून या प्रकरणामुळे शहरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.





## खोलेश्वरच्या प्रगती विभागात शिशुवाटिकेतील चिमुकल्यांचे बक्षीस वितरण उत्साहात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

खोलेश्वर प्राथमिक विद्यालय (प्रगती विभाग) शिशुवाटिकेतील चिमुकल्यांचा बक्षीस वितरण कार्यक्रम ०२ मार्च गुरूवार रोजी संपन्न झाला.

अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक विष्णू सोनवणे होते.यावेळी विभाग प्रमुख वर्षा मुंडे, शिशुवाटिका प्रमुख कल्याणी देशपांडे, मनिषा खोगरे उपस्थित होत्या. या प्रसंगी बोलताना वर्षा मुंडे म्हणाल्या की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम भा.शि.प्र.संस्था करते शिवाय या संस्थेतूनच त्यांचा व्यक्तिमत्व विकास होण्याच्या उद्देशाने शिशु वाटीके पासूनच प्रयत्न केले जातात.या शिशुवाटिकेतील चिमुकले ही सर्वच क्षेत्रात चमकदार यश प्राप्त करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विष्णु सोनवणे म्हणाले की, आपल्या संस्थेचे, विद्यालयाचे, पालकाचे नाव सर्वदुर पर्यंत पोहंचविण्याकरिता विद्यार्थ्यांनी मनःपूर्वक खुप अभ्यास करावा आणि यशस्वी व्हावे आपल्याला मिळणारे यश हे पुढील काळात प्रेरणा देणारे असून स्वतःच्या प्रगतीसाठी दिशादर्शक आहे.लहान वयातच जीवनावर चांगले संस्कार करता येतात व हे संस्कार मुलांना कायमस्वरूपी लक्षात राहतात याच संस्कारामुळे जीवनात चांगला व्यक्ती बनता येते असेही ते म्हणाले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना भेटवस्तु देण्यात आली. संपुर्ण कार्यक्रमाचे नियोजन कल्याणी देशपांडे,मनिषा खोगरे यांच्यासह इतरांनी केले या कार्यक्रमास शिक्षिका,शिक्षक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

## नागरीकांनो चुल पेटवा आंदोलनात सामील व्हा- राजेशकुमार जोगदंड

बीड: अॅड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशाने वंचित बहुजन आघाडीची वतीने ६ एप्रिल २०२६ रोजी ''नरेंदर कब मिलेगा सिलेंडर राज्यव्यापी आंदोलनाची'' प्रत्येक जिल्हा, शहर, तालुका ठिकाणी करण्यात येणार आहे. देशभरात गॅस सिलेंडरच्या तीव्र टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिकांना गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. मुजरा मोदीच्या देश विकण्याच्या आर्थिक नितीमुळे देशात गॅस सिलेंडरचा प्रचंड तुटवडा झाला आहे. महिला, गृहिणी, मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांना स्वयंपाकाच्या गॅससाठी तासन्तास लांब रांगेत उभे राहावे लागत आहे, तरीही गॅस मिळत नाही. गॅस सिलेंडरची काळाबाजार सुरू आहे. ९१२ रुपयांचा सिलेंडर काळाबाजारात ५००० ते ७५०० रुपयांना विकला जात आहे. भाजपा सरकारला जाब विचारण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर दि . ०६ एप्रिल २०२६ सोमवार सकाळी ११ वाजता मोठ्या संख्येने आंदोलनात सामील व्हावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडी बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख राजेशकुमार जोगदंड यांनी केले

## कारखान्यास मजूर पुरवतो म्हणून फसवणूक केल्याप्रकरणी आरोपीचा जामीन फेटाळला.

माजलगाव : कर्नाटक राज्यातील साखर कारखान्याला ऊसतोड मजूर आणि वाहने पुरवण्याचे आमिष दाखवून २२ लाख ८० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी आरोपीचा जामीन अर्ज माजलगाव येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे. वडवणी तालुक्यातील खडकी येथील फिर्यादी रामकिसन शंकर चोले यांनी श्री. बसवेश्वर शुगर लि. कारजोल (कर्नाटक) या कारखान्याशी मजूर पुरवण्याचा करार केला होता. या कामासाठी आरोपी सुधाकर भानुदास राठोड (रा. रामनगर, माजलगाव) याने फिर्यादीचा विश्वास संपादन करून, स्वतःकडे मजूर आणि वाहने उपलब्ध असल्याचे सांगितले. मजुरांच्या उचलीपोटी फिर्यादीने आरोपीला वेळोवेळी आर.टी.जी.एस. आणि चेकद्वारे एकूण २२ लाख ८० हजार रुपये दिले.मात्र, आरोपीने मजूर, वाहने पुरवली नाहीत आणि घेतलेली रक्कमही परत न देता फसवणूक केली. याप्रकरणी वडवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर. आरोपीने सत्र न्यायालयात जामिन अर्ज केला होता. सुनावणी दरम्यान फिर्यादीच्या वतीने सरकारी वकील अॅड.आर ए वाघमारे यांनी काम पाहिले तर अॅड. अरुण बंडू तिडके यांनी सरकार पक्षाला सहाय्य केले.दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर मा. सत्र न्यायाधीश श्रीमती परदेशी मॅडम यांनी गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोपी सुधाकर राठोड याचा जामीन अर्ज फेटाळून लावला.



जाहिर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.३०४/२०२५**
**डिगांबर किसन खंदारे विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय कारेगव्हाण**

पहा

डिगांबर किसन खंदारे रा. कारेगव्हाण ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक समाधान किसन खंदारे यांचा दिनांक १५/०६/२००८ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस कारेगव्हाण ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कारेगव्हाण ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक ०६/०३/२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०६/०४/२०२६ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते ऊसतोड कामगारांना ओळखपत्रांचे वितरण

### मार्च २०२६ अखेर जिल्ह्यात ५८४५ ऊसतोड कामगारांची नोंदणी पूर्ण

बीड । प्रतिनिधी

ऊसतोड कामगारांच्या समस्यांबाबत उपाययोजना करण्याचे निर्देश राज्य शासनास दिले. त्या अनुषंगाने राज्य शासनाने उच्च न्यायालयाच्या निर्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठित केली आहे. सदर समितीची बैठक दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये किमान ३ वर्षापासुन ऊसतोड कामगार म्हणून काम करीत असलेल्या ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करून नोंदणी करणे व त्यांना ओळखपत्र देणे या विषयावर सविस्तर चर्चा झाली.



ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करून त्यांची नोंदणी करणे व त्यांना ओळखपत्र देण्यासाठी शासनाने स्मार्ट सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड, पुणे या संस्थेची नियुक्ती केली आहे.

बीड जिल्ह्यात ऊसतोडणी कामगाराच्या सर्वेक्षणाचे काम सुरू झाले असून दिनांक ३१ मार्च, २०२६ अखेर एकूण ५८४५ ऊसतोड कामगारांची नोंदणी करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते १ एप्रिल २०२६ रोजी जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत प्रातिनिधिक स्वरूपात १० ऊसतोड कामगारांना ओळखपत्राचे वितरण करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, जिल्हा आरोग्य अधिकारी उल्हास गंडाळ, पोलीस उपअधीक्षक (गृह) उमाशंकर कस्तुरे, स्मार्ट सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड यांचे प्रतिनिधी सागर बोरा, सहायक आयुक्त, समाजकल्याण प्रदिप भोगले हे उपस्थित होते. जिल्हाधिकारी यांनी संस्थेच्या प्रतिनिधीना ऊसतोड कामगारांच्या सर्वेक्षणाचे काम जिल्हा प्रशासनाशी समन्वय ठेवून पुढील तीन महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्याच्या तसेच खऱ्या ऊसतोड कामगारांची नोंदणीच्या सूचना दिल्या. सोबतच बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांना संबंधित संस्थेकडे नोंदणी करण्यासाठी स्थानिक पातळीवर संपर्क करण्याचे आवाहन केले.

## पाटोदा तालुक्याला अवकाळीचा जोरदार तडाखा

### कांदा, आंबा आणि वैरणीचे अतोनात नुकसान

पाटोदा । प्रतिनिधी

काल रात्री पाटोदा तालुक्यात झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने शेती पिकांचे कंबरडे मोडले आहे. हातातोंडाशी आलेला कांदा, बहरलेला आंबा आणि जनावरांची वैरण पावसात भिजल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. एका बाजूला निसर्गाचा प्रकोप आणि दुसऱ्या बाजूला बाजारभावाची घसरण अशा कात्रीत पाटोदा तालुक्यातील बळीराजा अडकला आहे.

कांदा उत्पादकांचे दुहेरी नुकसान तालुक्यात सध्या कांदा काढणीचा हंगाम जोमात आहे. मात्र, कालच्या पावसाने शेतात काढून ठेवलेला आणि काढणीला आलेला कांदा पूर्णपणे भिजला आहे. भिजलेल्या कांद्याला सड लागण्याची भीती निर्माण झाली असून, पावसामुळे कांद्याचा दर्जाही खालावला आहे. सध्या बाजारात कांद्याला केवळ ८ ते ९ रुपये प्रति किलो भाव मिळत असल्याने उत्पादन खर्च निघणेही कठीण झाले आहे. त्यातच, कांदा वेचणीसाठी मजूर मिळेनासे झाले आहेत. जे मजूर उपलब्ध आहेत, ते ३०० ते ४०० रुपये इतकी मोठी मजुरी मागत असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत अधिकच भर पडली आहे. पावसासोबतच सुटलेल्या जोरदार वाऱ्यामुळे आंब्याचा मोहर आणि तयार होत असलेली फळे गळून पडली आहेत. तसेच, जनावरांसाठी साठवून ठेवलेली वैरण वाऱ्याने उडून गेली असून, उरलेली वैरण पावसात भिजून खराब झाली आहे. यामुळे आगामी काळात जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्याची चिन्हे आहेत. पाटोदा



तालुक्यातील अनेक भागांत शेती पिकांचे ३३ टक्क्यांहून अधिक नुकसान झाल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. ''रात्रभर झालेल्या पावसाने उभ्या पिकांची माती केली आहे. कर्जाचा डोंगर असताना आता पुढचे जगायचे कसे?'' असा सवाल हवालदिल झालेला शेतकरी विचारत आहे. या अस्मानी संकटामुळे झालेल्या नुकसानीचे शासनाने तात्काळ पंचनामे करावेत आणि पीडित शेतकऱ्यांना योग्य आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

## गुरुकृपा कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांनी मारली बाजी

माजलगाव । प्रतिनिधी

येथील गुरुकृपा कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या नुकत्याच जाहीर झालेल्या परीक्षांमध्ये उत्कृष्ट यश संपादन करत महाविद्यालयाचा नावलौकिक उंचावला आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या परीक्षेत महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी उच्च गुण मिळवत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला. काही विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली. या परीक्षेत महाविद्यालयाचा अंतिम वर्षाचा निकाल १००%, तृतीय वर्षाचा निकालही १००%, आणि द्वितीय वर्षाचा निकाल ९०% लागला



आहे. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रम, नियमित अभ्यास आणि प्राध्यापकांचे मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाले असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. गुणवंत विद्यार्थ्यांची यादी खालील प्रमाणे आहे बीपीटी अंतिम वर्ष ( १००% निकाल ) प्रथम क्रमांक श्रावस्ती जगताप = ६२% द्वितीय क्रमांक शामल चव्हाण = ६१.५% तृतीय क्रमांक मनीषा होके = ५७.८७% बीपीटी तृतीय वर्ष ( १००% निकाल ) प्रथम क्रमांक अलिशा काटे = ६६% द्वितीय क्रमांक श्रुती उन्हाळे = ६५.२% तृतीय क्रमांक मानसी जोंधळे = ६४.८% बीपीटी द्वितीय वर्ष ( ९०% निकाल) प्रथम क्रमांक यशराज पाटील = ६०% द्वितीय क्रमांक अमन शेख = ५९.८५% तृतीय क्रमांक राहुल पवार = ५९.४२% महाविद्यालयाचे प्राचार्य व सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच, भविष्यातही असेच यश संपादन करून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे गुरुकृपा कॉलेज ऑफ फिजिओथेरपी हे गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे अग्रगण्य संस्थान म्हणून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# ऊसतोड कामगारांच्या प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

बीड । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून ऊसतोड कामगारांचे विविध प्रश्न प्रलंबित असून, शासनाच्या उदासीन धोरणामुळे कामगारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रीय शिवशाहू ऊसतोड कामगार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष पांडुरंग वामनराव आंधळे यांनी येत्या २३ मार्च २०२६ पासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करत आहेत आज त्यांच्या उपोषणाला माऊली शिरसाट मोहन आघाव केशव तांदळे यांनी पाठिंबा दिला

या संदर्भात संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले




आहे. पांडुरंग आंधळे हे स्वतः गेल्या २० वर्षांपासून ऊसतोड कामगार म्हणून महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या विविध भागात काम करत आहेत. ऊसतोड कामगारांच्या हक्कासाठी त्यांनी गेल्या दहा वर्षांपासून वेळोवेळी लोकशाही मार्गाने लढा दिला आहे, परंतु अद्यापपर्यंत कामगारांना योग्य न्याय मिळालेला नाही. कामगारांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत: दरवाढ: ऊसतोडणी भरणीचा दर प्रति टन ५०० रुपये करावा आणि ऊस वाहतूक दरात दुप्पट वाढ करावी.

तसेच दरवर्षी दरवाढीचा करार करण्यात यावा. प्रसूती भत्ता: ऊसतोडणी कालावधीत प्रसूती होणाऱ्या महिला ऊसतोड कामगारांना २५ हजार रुपये सानुग्रह अनुदान एका महिन्यात खात्यावर जमा करावे. ओळखपत्र: ऊसतोड कामगारांची साखर कारखान्यांवरील यादीनुसार नोंदणी करून त्यांना अधिकृत ओळखपत्र देण्यात यावे. मजुरी वाढ: तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत गळीत हंगाम २०१४-१५ साठी जाहीर केलेली २०% मजुरी दर वाढ त्वरित लागू करण्यात यावी. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत माघार घेणार नसल्याचा पवित्रा पांडुरंग आंधळे यांनी घेतला आहे. या आंदोलनामुळे होणाऱ्या परिणामांची सर्व जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, साखर आयुक्त आणि महसूल मंत्री यांच्यासह विविध संबंधित विभागांना पाठवण्यात आल्या आहेत.

# नुकसानीचे पंचनामे करून तातडीने मदत-कृषीमंत्री

## राज्यात अवकाळी पावसामुळे १ लाख २२ हजारहून अधिक हेक्टर शेती पिकांचे नुकसान

पुणे : ''राज्यात वादळी वारा व गारांच्या पावसामुळे (अवकाळी) १ लाख २२ हजार हेक्टरहून (३ लाख ५ हजार एकर) अधिक क्षेत्रावरील शेती पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यभरातील नुकसानीची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेऊन तातडीने पंचनामे पूर्ण करुन बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत दिली जाईल'' अशी माहिती राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी भोर तालुक्यातील वडगाव डाळ येथे भेट देऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली आहे. या दौऱ्यादरम्यान त्यांनी गावातील नुकसान झालेल्या आंब्याच्या बागांचे तसेच विविध शेती पिकांचे प्रत्यक्ष पाहणी केली. अवकाळी पावसामुळे आंबा बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे यावेळी निदर्शनास आले. अनेक ठिकाणी फळगळ, झाडांचे नुकसान तसेच उभ्या पिकांवर परिणाम झाल्याचे दिसून आले. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.



कृषी मंत्री दत्तात्रय भरणे बोलताना पुढे म्हणाले की, मार्च महिन्याच्या शेवटच्या टप्प्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे राज्यभर मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः नाशिक (२९,८१२ हेक्टर), अहिल्यानगर (२३,६३३ हेक्टर), जळगाव (२२,३६१ हेक्टर), धुळे (१४,८३२ हेक्टर), बुलढाणा (८,५०७ हेक्टर) व छत्रपती संभाजीनगर (८,४४५ हेक्टर) आदी जिल्ह्यातील लाखो हेक्टरवरील पिके उद्ध्वस्त झाली आहेत. पुढे बोलताना दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यात केळी, गहू, मका, हरभरा, आंबा, ज्वारी, टरबूज, कलिंगड, भाजीपाला, डाळिंब, कांदा, संत्रा, द्राक्ष आदी पिकांचे तसेच फळबागांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अनेक ठिकाणी कांदा कुजला असून पपईची रोपेही खराब झाली आहेत. शेतात पाणी साचल्याने उभी पिके आडवी झाली असून मजुरी व खतांचा खर्च वाया गेला आहे.

यावेळी शेवटी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, ''अवकाळी पावसामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानीचे पंचनामे वेळेत पूर्ण करून बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत दिली जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी अजित पवार हे शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत. शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, अशी ग्वाही सर्व बांधवांना केली.

## मोहरीच्या पिकाला पुन्हा फुले आली, तर शेतकऱ्यांनी काय करावे



निसर्ग ही अनोखी फुलं देत राहतो. वसंत ऋतूतील मोहरीच्या शेतात हे दृश्य चांगलेच पाहायला मिळत आहे. एकीकडे पीक पक्क होणार आहे, मात्र त्याच पिकात नवीन फुले आली आहेत. यावेळी अधिक पाऊस आणि वातावरणातील बदलामुळे असे होत असल्याचे कृषी शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. नवीन फुलांच्या शेंगा येईपर्यंत शेतकऱ्यांनी वाट पाहिली तर आधीच पिकलेल्या शेंगा तुटून पडतील. वेळेवर पीक काढले तर उत्पादन कमी होते.

शेतकरी हे करतात : कृषी शास्त्रज्ञ डॉ. विकास मलिक यांनी सांगितले की, पिकामध्ये सुमारे ७५ टक्के मोहरीच्या शेंगा पिकलेल्याअसल्यास त्यांची काढणी करावी. नवीन फुले पाहून गोंधळून जाऊ नका. नवीन फुलांच्या शेंगा तयार होण्याची वाट पाहू नका, कारण यामुळे उर्वरित संपूर्ण शेंगा गळून पडतील आणि शेतकऱ्याचे मोठे नुकसान होईल.

असे का घडले : हवामानात वारंवार होणारा बदल, अतिवृष्टी यामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचे कृषी शास्त्रज्ञ डॉ.ओंकार सिंग यांनी सांगितले. याला भौतिक बदल म्हणता येईल. पिकावर विविध रोगांचाही प्रादुर्भाव होत असून त्यामुळे पांढरा रोगही आला आहे. मात्र, पिकात असा बदल का झाला, हे अद्याप स्पष्टपणे सांगता येत नाही.

## मडका पद्धतीने मशरूम उत्पादन; ३० ते ४० दिवसांत मिळते भरघोस उत्पन्न!

महाराष्ट्रात शेतकरी अलीकडे मोठ्या प्रमाणात मशरूम शेतीकडे वळत आहेत. मुख्य म्हणजे सध्या अनेक पिकांना योग्य तो बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी अन्य पर्यायांचा अवलंब करत आहेत. विशेष म्हणजे मशरूम उत्पादन करण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या जागेची आवश्यकता नसते. अगदी छोट्याशा जागेतही शेतकरी मोठ्या प्रमाणात मशरूमचे उत्पादन घेऊ शकतात. ज्यामुळे त्यांना अधिकचे उत्पन्न मिळण्यास मदत होते.

काय आहे मडका पद्धती?

महाराष्ट्रासह देशभरात सध्या मशरूमची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. यापूर्वी केवळ शहरी भागांमध्ये मशरूमला मागणी होती. मात्र, गेल्या काही दिवसांत ग्रामीण भागात देखील मशरूमची भाजी विशेष प्रसिद्ध झाली आहे. मडका पद्धतीने मशरूम उत्पादन घेण्यासाठी सर्वसाधारणपणे ३५ ते ४० दिवसांचा कालावधी लागतो. मशरूम उत्पादन घेण्यासाठी मडक्याला छिद्रे पाडले जातात. त्यास कापूस लावून बंद केले जाते. तसेच त्याच्या तोंडाला प्लास्टिकची पिशवी बांधली जाते. मडक्यावर दिवसातून दोन



ते तीन वेळा पाणी टाकले जाते. काही दिवसांनी या छिद्रांमधून कापूस बोळे काढून घेतले जाते.'या' गोष्टींची आवश्यकता : मडके मशरूम बियाण्याचा रोपणासाठी तयार होते. मडक्यावर रोपण केल्यानंतर ७ ते ८ दिवसांनी मशरूमच्या कळ्या दिसायला सुरुवात होते. त्यानंतर मशरूमवर नियमित पाणी शिंपडणे आवश्यक असते. याशिवाय मशरूम उत्पादनासाठी या कालावधीत दररोज कमीत कमी ४ ते ५ तास मशरूमला ट्यूबलाईटचा प्रकाश मिळणे आवश्यक असते. तसेच आपण तयार केलेल्या शेडमध्ये ७५ ते ८० आर्द्रता असणे आवश्यक असते.

किती मिळते उत्पादन? मडका पद्धतींने मशरूम उत्पादन घेण्यासाठी ३५ ते ४० दिवसांचा कालावधी लागतो. एका मडक्यापासून साधारणपणे एक किलोपर्यंत मशरूम मिळते. तर सर्वसाधारणे पद्धतीने त्याच ठिकाणी शेतकऱ्यांना ५०० ते ९०० ग्रॅमपर्यंत मशरूम मिळते. मडका पद्धतीमध्ये मशरूम उत्पादन घेताना दोन बॅचमध्ये जवळपास १० ते १५ दिवसांचा कालावधी ठेवला जातो. या पद्धतीत मशरूम काढणीनंतर, प्लास्टिक पिशव्यांमध्ये बांधून थेट बाजारात विक्रीसाठी पाठवला जाऊ शकतो. किंवा मग मशरूम वाळवला देखील जाऊ शकतो. यासाठी तो कपडयात बांधून उन्हात वाळवण्यासाठी ठेवावा लागतो.

## ड्रॅगन फळाची लागवड

ड्रॅगन हे एक प्रकारचे फळ आहे. हे फळ दिसायला खूप सुंदर आणि आकर्षक असल्याने लोकांमध्ये त्याची फार उत्सुकता आहे. ड्रॅगन फळांचे शास्त्रीय नाव हायलोसीरीयस अंडाटस असून कॅक्टस कोरफड वर्गातील ही वनस्पती आहे. पाण्याची टंचाई निर्माण झाली तरी, ही झाडी कायमची जळून जात नाहीत. फळांचा आकार कमी होईल, मात्र झाडे जिवंत राहतील. या पिकाला रोग आणि किडींचा प्रादुर्भाव नगण्य असून पीक संरक्षणावर जास्त खर्च येत नाही. देशात गुजरात, आंध्रप्रदेश, कर्नाटक, राज्यात सुद्धा लहान क्षेत्रावर व्यापारीदृष्ट्या पिकाची लागवड होत आहे. तसेच महाराष्ट्रातील कमी पावसाच्या क्षेत्रात उदा. सोलापूर, पुणे (शिरूर), सांगली (जत) येथे सुद्धा व्यापारी तत्त्वावर या पिकाची लागवड सुरू झाली आहे.

हवामान : ड्रॅगन फळ हे उष्ण कटिबंधीय फळझाड असून झाडांच्या व फळांच्या वाढीकरिता साधारणतः; २५ ते ३५ अंश सें.ग्रे. तापमान चांगले असते. त्याचप्रमाणे वार्षिक पर्जन्यमान ५०० ते १००० मि.मी. आवश्यक असून उष्ण व थोड्या प्रमाणात दमट हवामान आवश्यक आहे. मुख्य म्हणजे फळ वाढीच्या काळात भरपूर सूर्यप्रकाश असावा, परंतु सूर्यप्रकाशाची तीव्रता जास्त काळापर्यंत नसावी. सूर्यप्रकाशाची तीव्रता जास्त असल्यास अशा वेळेस झाडांना सावली करण्याची आवश्यकता भासते.

जमीन : ड्रॅगन फळ या पिकाच्या वाढीकरिता उत्तम पाण्याचा निचरा होणारी, जास्त प्रमाणात सेंद्रिय पदार्थयुक्त, वालुकामय तसेच मध्यम हलकी पाण्याचा योग्य निचरा होणारी जमीन अतिशय चांगली असते. अशा जमिनीत झाडांची वाढ भारी जमिनीतील झाडांपेक्षा जोमदार असते. जमिनीचा आम्ल-विम्ल निर्देशांक ५.५ ते ६.५ पर्यंत असावा. फळांची उत्तम प्रत व जादा उत्पादनासाठी जमिनीत सेंद्रीय खतांचा पुरवठा करणे आवश्यक असते. ड्रॅगन फळाची लागवड मुळ्या फुटलेल्या, कापलेल्या तुकड्यापासून करतात. याकरिता निवड केलेल्या मातृवृक्षापासून १५ ते २० सें.मी. लांबीचे कटिंग्ज काढून ते १ ते २ दिवस एकत्र ठेवावेत. शेणखत एक भाग,चांगली माती एक भाग आणि वाळू दोन भाग यांचे मिश्रण करून प्लॅस्टिक पिशवीत



भरून घ्यावे. प्रत्येक पिशवीत तयार केलेली कटिंग्ज लावून सर्व पिशव्या सावलीमध्ये मुळ्यांची व्यवस्थित वाढ होण्यासाठी ठेवाव्यात. नंतर मुख्य जाती शेतात लागवडीसाठी वापराव्यात. पिशवीत लावल्यानंतर २० ते २५ दिवसांनी मुळ्यांची वाढ जोमदार होण्यास सुरू होते.

लागवड : ड्रॅगन फळ पिकाची लागवड करण्यासाठी जमिनीची पूर्वमशागत झाल्यावर दोन झाडांमध्ये ३ मीटर व दोन रांगेत ३ मीटर अंतर ठेवून ६० सें.मी. ६० सें.मी. आकारमानाचे खडडे खोदून घ्यावेत. यामध्ये एकरी ४४५ झाडे बसतात. खडडे खोदून झाल्यावर खड्ड्याच्या मधोमध सिमेंट काँक्रीटचे खांब किंवा जी.आय. पोल आकाराचे पाईप पक्के बसवून घ्यावेत. या फळझाडाला पोल तसेच फ्रेमचा आधार देऊन वळवावे लागते. पोलची उंची कमीत कमी ६ फूट ठेवावी. नंतर खड्डे भरताना प्रत्येक खड्ड्यात अंदाजे १० किलो चांगले कुजलेले शेणखत व चांगली माती, रेती आणि २०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट यांचे मिश्रण टाकावे. त्याचप्रमाणे पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी खड्ड्यांच्या तळाशी बारीक विटांचे तुकडे टाकावेत. खडडे भरण्याचे काम पूर्ण झाल्यावर प्रत्येक खड्ड्यात पोलच्या समोरासमोर मुळ्या फुटलेल्या चार कटिंग्ज लावून घ्याव्यात. या लावलेल्या कटिंग्जची उभी वाढ होण्यासाठी झाडे वाढतील तसे खांबांना बांधून घ्यावीत. झाडांची लागवड झाल्यावर प्रत्येक काड्यांवर सेंद्रिय पदार्थाचे २० ते २५ सें.मी. उंचीचे आच्छादन करून झाडांना पाणी द्यावे.

खत व्यवस्थापन : ड्रॅन फळाच्या पिकाची लागवड नव्यानेच होत असल्याने या पिकावर भारतात खत व्यवस्थापनावर संशोधन झालेले नाही. इतर देशांत देण्यात येणाऱ्या खत व्यवस्थापनाचा अभ्यास करून या पिकास पुढीलप्रमाणे खते देण्याची शिफारस केलेली आहे. झाडांची उत्तम वाढ व फळांचे जादा उत्पादन व प्रत मिळविण्यासाठी प्रत्येक खड्ड्यांतील झाडांना १० किलो. चांगले कुजलेले शेणखत देऊन यामध्ये प्रत्येक वर्षी दोन किलो शेणखत जास्त द्यावे. जास्तीत जास्त २० किलोपर्यंत वाढ करावी. झाडांची वाढ होण्यासाठी सुरुवातीला प्रत्येक खड्ड्यातील झाडांना रासायनिक खते प्रत्येकी ४ महिन्यांनी खालीलप्रमाणे उपलब्ध करून द्यावीत.

पाणी व्यवस्थापन : झाडांची जोमदार वाढ व उच्च प्रतीची फळे मिळविण्यासाठी कोरड्या हवामानात पाणी देण्याची अत्यंत गरज असते. ठिबक सिंचनाद्वारे पाणी दिल्यास पाण्याची बचत होऊ शकते. शिवाय ठिबक संचामधून खतांच्या मात्रासुद्धा देता येतात. फळ पोसण्याच्या काळात झाडाला पाण्याची कमतरता भासल्यास फळांना तडे जाण्याची शक्यता असते. शिवाय फुलांची गळही होते.

झाडांना फुलांची निर्मिती : ड्रॅगन फळ झाडाला रात्रीच्या वेळी फुलांची निर्मिती होत असते. लागवड केलेल्या झाडांची पूर्ण वाढ झाल्यावर पहिल्या वर्षी फुलांची निर्मिती चालू होते. फुले ऑफ व्हाईट रंगाची असतात व सुवासिक असतात. फुलांची निर्मिती एप्रिल-मे महिन्यात सुरू होते.

फळ निर्मिती : फुलांची निर्मिती झाल्यावर फळे ३० ते ३५ दिवसांत काढणीस तयार होतात. फळांची काढणी नोव्हेंबर महिन्यापर्यंत चालू असते. या काळात फळाची काढणी ५ ते ६ वेळा करावी लागते. अपक्व फळांची वरील साल चकचकीत हिरव्या रंगाची असते. त्यानंतर जेव्हा सालीचा रंग लाल होतो तेव्हा फळ काढणीस तयार झाले आहे, असे समजावे. फळाच्या हिरव्या सालीचा रंग लाल होण्यास अंदाजे ४ ते ५ दिवस लागतात. या वेळेस फळांची काढणी करता येते. निर्यातीसाठी फळांची काढणी रंग बदलत असताना एक दिवस अगोदर करावी.छाटणी : फळांची काढणी संपल्यानंतर झाडांची दरवर्षी नियमित छाटणी करणे आवश्यक आहे. छाटणी करताना झाडांचा वरील भाग छत्रीच्या आकाराचा राहील, असे पाहावे आणि अडचणीच्या फांद्यांची छाटणी करावी म्हणजे संपूर्ण झाडाला आतपर्यंत सूर्यप्रकाश मिळू शकेल. नियमित छाटणी केल्यास झाडांवर नवीन फूट येऊन पुढील वर्षात जास्त फळांचे उत्पादन मिळू शकते. उत्तम व्यवस्थापन व मशागत असल्यास ड्रॅगन फळाचे ४ ते १० टन प्रति एकर उत्पादन मिळते. सध्या बाजारात ड्रॅगन फळाचा दर रु. १०० ते २५०/- प्रति किलोपर्यंत आहे. महाराष्ट्रातील उष्ण हवामान असणाऱ्या जिल्ह्यांतील प्रयोगशील शेतकऱ्यांनी या फळ पिकांची लागवड केल्यास निश्चितपणे फायदेशीर ठरते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८८२ : ब्रिटन च्या पहिल्या इलेक्ट्रिक ट्राम ईस्ट लंडन मध्ये चालू झाल्या .
१९४४ : दुसरे महायुद्ध ब्रिटिश व अमेरिकन फौजांनी रुमानियातील बुखारेस्टवर केलेल्या बॉम्बहल्ल्यात ३००० नागरिक ठार झाले.
१९४९ : पश्चिम युरोपातील अकरा देश आणि अमेरिका अशा १२ देशांनी संरक्षणविषयक सामंजस्य करार करुन 'नाटो'ची स्थापना केली.
१९४९ : पश्चिम युरोपातील राष्ट्रे व अमेरिका यांच्यात संरक्षणविषयक उत्तर अटलांटिक करार म्हणजे 'नाटो करार' करण्यात आला.
१९६८ : 'नासा'ने 'अपोलो-६' चे प्रक्षेपण केले.
१९६८ : मेम्फिस, टेनेसी येथे जेम्स अर्ल रे याने मार्टिन ल्युथर किंग (ज्युनिअर) यांची हत्या केली.
१९९० : लता मंगेशकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२३ : सर कार्ल विल्हेम सिमेन्स जर्मन/ब्रिटिश विद्युत अभियंता, अभियांत्रिकी क्षेत्रात काम करणारी 'सिमेन्स' ही बलाढ्य कंपनी त्याच्याच भावाने स्थापन केली आहे. (मृत्यू: १९ नोव्हेंबर १८८३)
१८४२ : एडवर्ड लूकास फ्रेन्च गणिती (मृत्यू: ३ आक्टोबर १८९१)
१८९३ : पायोनियर इन्स्टुमेंट कंपनी चे सहसंस्थापक चार्ल्स हर्बर्ट कॉल्विन यांचा जन्म. (मृत्यू: ३ जुलै १९८५)
१९०२ : पं नारायणराव व्यास ग्वाल्हेर घराण्याचे शास्त्रीय गायक (मृत्यू: १ एप्रिल १९८४)
१९०६ : फिशर इलेक्ट्रॉनिक्स चे स्थापक एवेरी फिशर यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १९९४)
१९३३ : रामचंद्र गंगाराम तथा 'बापू' नाडकर्णी डावखुरे मंदगती गोलंदाज
१९७३ : भारतीय संचालक आणि पटकथालेखक चंद्र शेखर येलेती यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६१७ : जॉन नेपिअर स्कॉटिश गणितज्ञ, लॉगॅरिथम सारणीचे जनक (जन्म: ? ? १५५०)
१९२३ : जॉन वेन ब्रिटिश गणितज्ञ (जन्म: ४ ऑगस्ट १८३४)
१९३१ : आंद्रे मिचेलिन फ्रेन्च उद्योगपती (जन्म: १६ जानेवारी १८५३)
१९६८ : मार्टिन ल्युथर किंग (ज्युनिअर) कृष्णवर्णीयांचे गांधी म्हणून ओळखले जाणारे अमेरिकेतील मानवी हक्क कार्यकर्ते आणि नोबेल पारितोषिक विजेते यांची हत्या (जन्म: १५ जानेवारी १९२९)
१९७९ : पाकिस्तानचे चौथे राष्ट्राध्यक्ष आणि ९ वे पंतप्रधान झुल्फिकार अली भूट्टो यांना फाशी (जन्म: ५ जानेवारी १९२८)
१९८७ : सच्चिदानंद हिरानंद वात्स्यायन तथा 'अज्ञेय' ज्ञानपीठ पारितोषिक (१९७८) व साहित्य अकादमी पुरस्कार (१९६४) विजेते हिन्दी लेखक व वृत्तपत्रकार (जन्म: ७ मार्च १९११- खुशीनगर, देवरिया, उत्तर प्रदेश)
१९९६ : आनंद साधले संस्कृत वाङ्मयातील अनेक ग्रंथांचा मोठ्या रसाळ पद्धतीने मराठीत परिचय करुन देणारे साहित्यिक (जन्म: ५ जुलै १९२०)
२००० : वसंतराव कृष्णाजी गोंधळेकर कलादिग्दर्शक (जन्म: )
२०१६ : भारतीय वकील आणि राजकारणी पी. ए. संगमा यांचे निधन. (जन्म: १ सप्टेंबर १९४७)

## द्राक्षांच्या देठाजवळ क्रॅकिंग टाळण्यासाठी फवारणी



काही भागात सध्या काळ्या द्राक्षांची काढणी सुरू आहे. पाऊस झाल्यास काळ्या द्राक्षांच्या मण्यांवर देठाजवळ क्रॅकिंग होण्याची शक्यता असते. पावसाचे पाणी वेलींच्या मुळांजवळ साचल्यास मुळे जास्त पाणी शोषून घेतात. वातावरणामध्ये जास्त सापेक्ष आर्द्रता वाढलेली असल्यामुळे पानांद्वारे होणारे पाण्याचे बाष्पीभवन नेहमीपेक्षा कमी होते. साहजिकच मुळांनी शोषून घेतलेले पाणी मण्याकडे ओढले जाते. पाण्याचा दाब वाढल्यामुळे मण्याला तडा जातो. काळ्या जातीमध्ये काढणीआधीच तडा जाईल याची खात्री नसते. काढणीनंतर बॉक्सेसमध्ये घड बंद केल्यानंतर आतील आर्द्रता वाढते. बॉक्समध्ये मण्यांना तडा जातो. त्यातून रस बाहेर येतो. त्यावर बुरशी वाढून सर्व घड कुजण्याची शक्यता असते.

उपाययोजना : पाऊस पडल्यानंतर दुपारच्या वेळेस चांगले ऊन पडून बागेत बऱ्यापैकी वारे वाहत असल्यास क्रॅकिंगचा धोका राहत नाही. बागेतील जमीन काळी व पाणी धरून ठेवणारी असल्यास पाऊस येण्याचे लक्षण दिसल्यास बागेत हलके पाणी द्यावे. हलका पाऊस झाल्यास मुळाजवळील जमीन पाण्याने पूर्णपणे संपृक्त होईल इतपत पाणी द्यावे.

त्यामुळे मुळे पाणी शोषून घेणे थांबवतील. पाऊस आणि ढगाळ वातावरण जाईपर्यंत मुळाच्या परिसरातील पाणी कमी होऊ न दिल्यास क्रॅकिंगचा धोका कमी होईल. हलक्या जमिनीत हा उपाय मदत करणार नाही. घड ओला असताना काढू नये. बागेत बऱ्यापैकी सूर्यप्रकाश असताना आणि घडावरील दव, पावसाचे किंवा फवारणीचे पाणी संपूर्ण सुकलेले असतानाच घडाची काढणी करावी.

क्रॅकिंगचा धोका जास्त वाटल्यास घडांवर कायटोसॅन ३ मिली अधिक ट्रायकोडर्मा २.३ ग्रॅम प्रतिलिटर पाणी याप्रमाणे मिसळून फवारावे.

# मृत्यू अर्भक प्रकरणी पोलिसांनी आरोपीला पकडले

जालना । प्रतिनिधी

परतूर मंठा वाटुर फाटा येथे एक अंदाजे पाच ते सहा महिन्याचे नवजात स्त्री जातीचे अर्भक मृत अवस्थेत कागदात गुंडाळून ठेवलेल्या अवस्थेत ठेवल्याची माहीती मिळाल्याने वाटूर पोलीस चौकीचे पोलीस उपनिरीक्षक नंदू खंदारे यांचे फिर्यादीवरुन पोलीस ठाणे परतूर येथे गु.र.नं. ४३/२०२६ कलम ९१ भा.न्या.सं. २०२३ नुसार गुन्हा दाखल होवून तपास पोस्टेचे वाटुर चौकी इनचार्ज व सहा. पोलीस निरीक्षक श्री. बालाजी वैद्य यांचे कडे दिला. त्यानंतर त्यांनी प्रथम नवजात अर्भकास जालना येथे रुग्नालयात दाखल केले व घटना घडली त्याठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासुन तपासाची चक्रे फिरवून तपासास सुरुवात केली. घटनास्थळाच्या आजुबाजुच्या सीसीटीव्ही फुटेज तपासल्या नंतर परतुर कडुन जालना जाताना एक मोटार सायकल वर एक पुरुष व दोन महिला असे तीघेजन तोंडाला रुमाल गुंडाळून वादुर फाटा येथे घटलेल्या ठिकाणाजवळ थांबले व त्यापैकी एकाने आजुबाजुला नजर फिरवुन त्यानंतर त्यापैकी एका महिलेने घटनास्थळावर जावुन तेथे काहीतरी ठेवल्यासारखे सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसले. त्यानंतर तपास अधिकारी श्री वैद्य सोबत यांचे सोबत वाटुर चौकीचे ग्रे. पोज्पनी खंदारे, पोका देवीदास जाधव, पोका राम पारवे, पोका अमोल तिबुले, पोका महेश कोरडे असे सर्व स्टाफ वाटर ते परतूर तसेच परतूर ते जालना रोडवरील सर्व सीसीटीव्ही फुटेज चेक करुन तपासाला गती देवून मा. वरीष्टांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हाचा तपास चालु ठेवला.

तेव्हा सदर मोटार सायकल वरील तीन संशयीत व्यक्तीची ह्या टोलनाका क्रॉस करुन जालना कडे जाताना दिल्या त्यानंतर जालना पोलीस कंट्रोल रुम मधील सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर सदरील मोटार सायकल ही मंठा चौफुली जालना येथून लालबाग जालना येथे जाताना दिसली तेव्हा मा. सपोनी वैद्य व ग्रे. पोज्पनी खंदारे यांनी त्यांचे गुप्त बातमीदार नेमून सदर मोटार सायकल व त्यावरील संशयीत व्यक्तीची माहीती घेतली असता मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी पोस्टेचे पोका देवीदास जाधव, पोका राम पारवे, पोका अमोल तिबुले, पोका महेश कोरडे असे आरोपी शोध कामी सकाळी सापळा रचला



असता यातील संशवीत महिला नामे शिवानी कैलास निकाळजे वय २३ वर्षे रा. राजीव गांधी नगर लालबाग जालना वांना महिला पोलीस अंमलदार वाघ मॅडम यांनी ताब्यात घेवून गुन्ह्याचे संदर्भात विश्वासात घेवुन विचारपुस केली तेव्हा त्यांनी सदरचा गुन्हा कबुल करुन गुन्ह्याचा घटना क्रम पोलीसांसमोर सांगितला आहे. सदर गुन्हा करण्यासाठी तिला तीचा होणारा पती गणेश बबन कांबळे रा. रामनगर जालना व तिची सासु दुर्गाबाई बबन कांबळे रा. रामनगर जालना असे व आरोपी गणेश कांबळे यांचा इतर एक नातेवाईक असे एकुण चार लोकांनी सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली होती त्यावरुन गुन्ह्यातील आरोपी गणेश बबन कांबळे हा फरार होता त्याचे शोधात वाल्मिक नगर, जालना येथे सपोनी वैद्य व पोउपनी खंदारे यांनी गुप्त बातमीदार नेमुन त्यांना मार्गदर्शन केले होते. त्यानंतर दि. ३१/०३/२०२६ रोजी गुप्त बातमीदारांमार्फत माहीती मिळाली की, सदर गुन्ह्यातील आरोपी गणेश बबन कांबळे हा त्याचे घरी वाल्मिक नगर, जालना येथे आलेला आहे अश्या मिळालेल्या बातमी वरुन आम्ही पोउपनी खंदारे सोबत पोका देवा जाधव, पोका राम पारवे, मपोका वाघ असे रवाना झालो व सदर आरोपीस ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याने त्यास गुन्ह्यात अटक करुन ०३ दिवस घेतली होती. त्यानंतर मध्ये गुन्ह्याचे तपासा दरम्याण आरोपीस विश्वासात घेवुन विचारपुस केली असता माहे-०३/२०२५ मध्ये त्याचे भिमनगर जालना येथील एका महिले सोबत शारिरीक संबंध झाले होते तिने सुद्धा सदर आरोपीकडुन गर्भपाताच्या गोळ्या घेवुन बेकायदेशीर गर्भपात करुन भिम्मनगर जालना येथील कचराकुंडीत टाकले होते त्यावरुन सदर बजार पोलीस ठाणे येथे संपर्क करुन माहीती घेता तेथे गु.र.नं. २३५/२०२५ कलम ९१ बी.एन.एस प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून तो सदर आरोपीने केल्याचे तपासात निष्पन्न झाल आहे. सदर आरोपीने गर्भपाताच्या गोळ्या स्वामी विवेकानंदर हॉस्पीटल जालना येथे लॅब असिस्टंट म्हणून काम करणारा प्रकाश कसबे रा. संजय नगर, जालना यांचे कडुन बेकायदेशीर रित्या घेवून यातील महिला आरोपी शिवानी निकाळजे हिस देवुन तिचा बेकायदेशीर रित्या गर्भपात केला आहे. सदर गुन्ह्यात चार आरोपी निष्पन्न झालेल असुन त्यापैकी दोन आरोपी नामे १) प्रकाश कसबे रा. संजय नगर, जालना व २) दुर्गाबाई बबन कांबळे रा. वाल्मिक नगर, जालना हे फरार असुन त्यांचा शोध घेणे कामी मा. पोनी भागवत सो यांचे मार्गदर्शनाखाली एक पथक रवाना केले आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. अजय कुमार बंसल सो, मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री. आयुष नोपानी सो, मा. ज्यविभागीय पोलीस अधिकारी परतुर श्री. रामेश्वर रेंगे सो यांचे मार्गदर्शनाखाली मा. पोनी भागवत सो यांनी व वाटूर चौकीचे पोउपनी नंदु खंदारे, पोका देवीदास, पोका राम पारवे, पोका अमोल तिबुले, पोका प्रशांत काळे, पोका सुनिल इलग, पोका महेश कोरडे व मपोका सपना वाघ यांनी मिळून वरिष्टांच्या मार्गदर्शनाखाली सखोल तपास करुन व तांत्रिक गोष्टीचे विष्लेशन करुन पार पाडली आहे.

## जालन्यातील भीषण अपघात ; पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडेंकडून हळहळ

जालना । प्रतिनिधी

समृध्दी महामार्गावर झालेल्या भीषण अपघाताच्या घटनेवर राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जिल्हयाच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी हळहळ व्यक्त केली आहे. मृत्यूमुखी पडलेल्या परिवारा विषयी त्यांनी संवेदना व्यक्त केल्या असून मृत व जखमी व्यक्तीच्या परिवाराला शासनाकडून मदत मिळवून देणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

भीषण अपघाताची घटना आज समृध्दी महामार्गावर घडली. भरधाव वेगात येणाऱ्या ट्रकने रस्त्यात थांबलेल्या पिक अप व्हॅनला जोराची धडक दिल्याने पिक अप मधील सात महिला मजुर जागीच ठार झाल्या तर अन्य पाच ते सहा जण गंभीर जखमी झाले आहेत.हे सर्व जण बदनापूर तालुक्यातील कडवंची व केळीगव्हाण येथील आहेत. घटना समजताच पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांकडून अपघाताची माहिती जाणून घेतली व मृतांच्या कुटुंबियांप्रती शोक संवेदना व्यक्त करत हळहळ व्यक्त केली. मृत व जखमींना शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करू करू असे त्या म्हणाल्या. जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांना फोन करून त्यांनी जखमींवर तातडीने आवश्यक ते सर्व उपचार करण्याच्या सूचना दिल्या.

## ॲपको कंपनीने शासनाच्या कोट्यावधी रुपयाच्या महसूलला लावला चुना!

### कमी रॉयल्टी भरून जास्तीचे मुरूम उत्खनन

मंठा । प्रतिनिधी

ॲपको कंपनीकडून हेलसवाडी शिवारातील पाझर तलावातील मुरूम उत्खनन करताना दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन केले असून दिलेल्या परवानगीपेक्षा हजारो ब्रास अधिकचे मुरूम उत्खनन करून शासनाच्या कोट्यावधी रुपयांच्या महसूलला कंपनीने चुना लावला आहे. ॲपको कंपनीला दिलेले गौण खनिज उत्खनन ना हरकत रद्द करण्यात यावे अशा आशयाचे पत्र उपविभागीय जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण उपविभाग परतूर यांनी जिल्हा जलसंधारण अधिकारी जालना यांना दिले आहे. जालना ते नांदेड समृद्धी महामार्गाचे काम सुरू असून या कामासाठी ॲपको कंपनीला हेलसवाडी ग्रामपंचायत, तलाठी, मंडळ अधिकारी व तहसीलदाराच्या अहवालानुसार जिल्हाधिकारी जालना यांनी काही अटी व शर्तीच्या अधीन राहून मुरूम उत्खननाची परवानगी दिली होती. मात्र दिलेल्या परवानगी व्यतिरिक्त अनधिकृतरीत्या कंपनीने मुरूम उत्खनन केल्याच्या तक्रारी जिल्हा प्रशासन व संबंधित अधिकाऱ्यांना दिल्यानंतर उपविभागीय जलसंधारण अधिकारी कार्यालयातील अभियंत्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून आपला अहवाल वरिष्ठांना पाठविला होता.

मे.ॲपको इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला हेलसवाडी येथील पाझर तलाव क्रमांक १ व २ मधील नेमून दिलेल्या मार्किंगनुसार खोदकाम करण्यात आले नाही, या कंपनीने मुरूम उत्खनन करताना दोन्ही तलावांमधील अंतर ३० मीटर कमी केले आहे तसेच धरणाच्या मुख्य भिंतीपासून १५ मीटर अंतर सोडून माती मुरूम उत्खनन करण्यात यावे असे नमूद असताना देखील तलावाच्या मुख्य भिंतीलगत खोदकाम केले आहे. सदरील उत्खनन बुडीत/ संपादित क्षेत्रात करण्यात यावे पाझर तलावातील सीमांकन केलेल्या भागांमध्ये काळी मातीची खोली सोडून कमाल निव्वळ दोन मीटर खोलीपर्यंत मुरूम काढण्यात व सांडव्याची तूटफूट झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदार/ यंत्रणाची राहील असे नमूद असताना देखील पाझर तलाव क्रमांक १ च्या सांडव्याची बॉडीवॉल १०.३० मीटर एवढी फोडण्यात आली व दोन मीटर पेक्षा अधिक खोल करून तीन, चार मीटर व काही ठिकाणी पाच मीटर खोल करून उत्खनन करण्यात आले आहे.मृद व जलसंधारण उपविभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित कंपनीचा वारंवार करूनही कंपनीच्या गुत्तेदाराकडून अवैध उत्खनन करणे सुरूच असून शासनाच्या अटी व शर्तीचे पालन न केल्यामुळे त्यांना दिलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात यावे असे पत्र उपविभागीय जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण उपविभाग परतुर यांनी जिल्हा जलसंधारण अधिकारी जालना यांना दिले असून शासन कंपनीच्या विरोधात काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




## स्व. बाबासाहेब बोराडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ पाणपोईचा शुभारंभ

मंठा । प्रतिनिधी

माजी सरपंच तथा माजी जिल्हा परिषद सदस्य स्व. बाबासाहेब देविदासराव बोराडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ छत्रपती शिवाजी महाराज चौकात पाणपोईचा शुभारंभ नगरसेवक सचिन बोराडे यांच्या हस्ते करण्यात आला. पाणपोईचे हे १४ वे वर्ष आहे.

सध्या उन्हाची तीव्रता प्रचंड प्रमाणावर वाढली आहे. त्यामुळे अनेक सामाजिक संघटनांकडून नागरिकांना पानपोईद्वारे थंडगार पाणी वाटप केले जाते. येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात झालेल्या पानपोईच्या उद्घाटन प्रसंगी प्रतिष्ठित व्यापारी गणेश शहाणे, नगरसेवक सतीश बोराडे, शिवाजी शहाणे, केशव बोराडे, दीपक बोराडे, अब्दुल भाई कुरेशी, गणेश बोराडे, सुशील बोराडे, अनिल बोराडे, सुधाकर घनवट, आकाश कास्तोडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## जालना शहर महानगरपालिकेत आयुक्त अंजली शर्मा यांची नियुक्ती

जालना । प्रतिनिधी

जालना महानगरपालिकेच्या रिक्त असलेल्या आयुक्त पदावर अखेर राज्य शासनाने नियुक्ती केली आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी श्रीमती अंजली शर्मा यांची जालना महानगरपालिकेच्या नवीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाचे सहसचिव सुभाष उमराणीकर यांनी गुरुवारी (२ एप्रिल) यासंदर्भातील अधिकृत आदेश निर्गमित केले आहेत. अंजली शर्मा या २०२१ च्या बॅचच्या आयएएस अधिकारी असून, यापूर्वी त्या नंदुरबार येथे सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होत्या.



जालना महानगरपालिकेचे आयुक्त पद रिक्त असल्याने जिल्हाधिकारी श्रीमती अशिमा मित्तल यांच्याकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. शासनाच्या नवीन आदेशानुसार, नवनियुक्त आयुक्त अंजली शर्मा यांनी जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांच्याकडून आपल्या पदाचा कार्यभार तातडीने स्वीकारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जालना नगरपालिकेचे रूपांतर महानगरपालिकेत झाल्यानंतर शहराच्या विकासाचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. नवीन आयुक्तांच्या नियुक्तीमुळे शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि इतर नागरी सुविधांच्या कामाला आता गती मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांना 'सुप्रीमों' प्रणालीवर आपला अहवाल अपडेट करण्याच्या सूचनाही सामान्य प्रशासन विभागाने दिल्या आहेत.

## पात्र नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ देणार

### त्यांचा सक्रीय सहभाग वाढविण्यावर भर देणार, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांची ग्वाही

हिंगोली । प्रतिनिधी

हिंगोली जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध शासकिय योजनांवर भर देऊन त्यामध्ये नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविण्याचे प्रयत्न केले जाणार असून आगामी काळात रोजगार व नवीन उद्योग उभारणीकडे विशेष लक्ष दिले जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी समाज माध्यमांना दिलेल्या विशेष मुलाखतीमध्ये दिली आहे. हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी समाज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी हिंगोली जिल्हयाची शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक परिस्थिती मांडली. प्रशासन, विकास आणि लोकसहभाग यांचा समतोल साधत जिल्ह्यात राबविण्यात असलेल्या योजनांचीही त्यांनी माहिती दिली. यामध्ये प्रामुख्याने शासकिय योजनांमधून नागरीकांचा सक्रीय सहभाग वाढवून जास्तीत जास्त पात्र नागरीकांपर्यंत शासकिय योजनांची माहिती देऊन त्याचा लाभ देण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हिंगोली जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनाची सकारात्मक भुमीका असल्याचेल सांगतक त्यांनी जिल्ह्यात महसूल अभियान, आरोग्यविषयक मोहिमा, सिंचन प्रकल्प तसेच पायाभूत सुविधा विकासाच्या कामांद्वारे नागरिकाभिमुख सेवा अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याची माहिती दिली. शेतकरी, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून त्यांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय पर्यटन विकास, शेती क्षेत्रातील नव्या संधी, युवकांसाठी कौशल्य विकास आणि रोजगारनिर्मिती तसेच महिला स्वयंरोजगारासाठी स्थानिक संसाधनांचा प्रभावी वापर याबाबत प्रशासनाकडून विविध उपक्रम राबविले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हिंगोली जिल्हयात महिलांनी उत्पादित केलेल्या हळदीला अंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी मिळावी यासाठी हिंगोली गोल्ड हळद चे ब्रँडींग करण्यात आले. लोकप्रतिनिधी तसेच उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना याबाबत माहिती देऊन त्या त्या जिल्हयातून हिंगोली गोल्ड हळदीची मागणी नोंदविण्याची विनंती त्यांनी केली.

या शिवाय बचतगटातील महिलांनी तयार केलेल्या वस्तू तसेच खाद्यपदार्थांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी शहरी तसेच ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्टया सक्षम केले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-८४२**
**दिनांक - १४/१०/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती रजिया उस्मान शेख रा. चिंचखेड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रजिया उस्मान शेख | स्वतः | ०१/०१/१९६१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## बहिरवाडीत हजारो भाविकांच्या उपस्थितीत पारायणाची सांगता

### सभागृह क्षमतेपेक्षा अधिक भाविकांची उपस्थिती,दर्शनासाठी मंदिरात गर्दी

नेवासा । प्रतिनिधी

तालुक्यातील जागृत देवस्थान श्री क्षेत्र बहिरवाडी येथे श्री कालभैरवनाथांच्या यात्रेनिमित्त आयोजित त्रिदिनात्मक नामसप्ताह व पारायण सोहळ्याची बुधवारी देवगड संस्थानचे महंत भास्करगिरी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. मुख्य यात्रा असल्याने सकाळी आठ वाजता गंगेवरून आणलेल्या कावडीच्या पाण्याने भगवान कालभैरवनाथांना जलाभिषेक करण्यात आला. त्यानंतर भास्करगिरी महाराज व मध्यमेश्वर देवस्थानचे प्रमुख महंत ऋषिनाथ महाराज यांनी मूर्तीचे पूजन करून दर्शन घेतले. टाळ-मृदुंगाच्या गजरात भजने गात भास्करगिरी महाराजांचे स्वागत करण्यात आले. भास्करगिरी महाराज म्हणाले,



बहिरवाडी येथील श्री कालभैरवनाथ हे जागृत दैवत असून दृष्ट प्रवृत्तीचा संहार करण्यासाठी ते अवताररूपाने कार्य करतात. त्यांच्या भक्तीमुळे परिसराचा कायापालट झाला असून अनेक विकासकामे मार्गी लागली आहेत. या भागातील युवा संत मंडळीही उत्तम कार्य करत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच पारमार्थिक कार्याची ज्योत तेवत ठेवत नियम व शिस्तीने देवस्थानाचे धार्मिक वैभव जपण्याचे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी आमदार विठ्ठलराव लंघे उपस्थित होते. बहिरवाडीकडे येणाऱ्या रस्त्याच्या कामांना खडीकरणाने सुरुवात झाल्याने भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते आमदार लंघे यांचा सन्मान करण्यात आला. तसेच या सोहळ्यात योगदान देणाऱ्या दात्यांचा व संत मंडळींचा श्री कालभैरवनाथ देवस्थानच्यावतीने गौरव करण्यात आला. यावेळी देवगडचे सेवेकरी बाळू महाराज कानडे, तात्या महाराज शिंदे, नारायण महाराज ससे, रामनाथ महाराज पवार, लक्ष्मण महाराज नांगरे, विजय महाराज पवार, शुभम महाराज बनकर, गणेश महाराज तनपुरे यांच्यासह श्री कालभैरवनाथ पब्लिक ट्रस्टचे अध्यक्ष-विश्वस्त, समस्त ग्रामस्थ, श्री कालभैरवनाथ युवा मंच, श्री कालभैरव तरुण मंडळ, श्री कालभैरवनाथ यात्रा समितीचे पदाधिकारी आणि पंचक्रोशीतील भाविक उपस्थित होते. बहिरवाडी येथे आयोजित त्रिदिनात्मक नामसप्ताह व काल्याच्या कीर्तनासाठी उभारण्यात आलेल्या सभागृहाची क्षमता सुमारे ७ हजार होती. मात्र यापेक्षाही अधिक भाविक उपस्थित राहिल्याने परिसरात मोठी गर्दी झाली. टाळ-मृदुंगाच्या गजरात भजने, कीर्तन व धार्मिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. भास्करगिरी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सोहळ्याची सांगता झाली.

# घाटसावळी गावातील ३५० हेक्टरवर जलक्रांती

बीड । प्रतिनिधी

घाटसावळी हे गाव माझ्या अनुभवातून क्रांतिकारी व राजकीय, व्यावसायीक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या घाटसावळी येथिल शेतकरी बागायतदार होण्यासाठी अनेक वर्षांपासून झगडत असल्याचे मी ऐकले होते मात्र आज त्यांच स्वपन्न प्रत्येक्षात पुणे येथील प्राज फाऊंडेशन व परळी येथील विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटी यांच्या माध्यमातून पूर्ण होईल असं मला वाटतंय.घाटसावळी येथिल डोंगर पायथ्याशी असलेल्या पाझर तलाव साठवण व मजबुती कामाच्या उद्घाटन प्रसंगी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके बोलताना सांगितले, उद्घाटनप्रसंगी प्राज फाऊंडेशन पुणे चे सि एस आर मॅनेजर सुरेश रेणूसे, विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटी चे प्रकल्प संचालक इंजिनिअर प्रकाश चोले, सामाजिक कार्यकर्ते नारायण घुंगसेसह घाटसावळी गावचे सरपंच पदाधिकारी ग्रामस्थ व लाभदारक शेतकरी महिला उपस्थित होत्या.

बीड चे तहसीलदार चंद्रकांत शेळके हे सामाजिक भान जपणारे व्यक्तिमत्त्व असुन त्यांना प्रशासनाने अतिमहत्त्वाच्या कामाच्या घाईत पण माझ्या तालुक्यातील शेतकऱ्यांच्या काळ्या आईची काळजी घेणाऱ्या शेतकऱ्यांना पाणी देण्यासाठी सामाजिक संस्था माझ्या तालुक्यातील घाटसावळी येथे काम करणार असतील तर मी पण तुमच्या सोबत आहे तुमच्या शेतकरी जलक्रांती साठी माझ्या महसूल विभागाच्या वतीने जी मदत तुम्हाला लागेल ती मी देणार असल्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.कार्यक्रमाचे सविस्तर



प्रास्ताविक चंद्रकांत बप्पा फड यांनी मांडले त्यांनी सर्व इतिहास सविस्तर मांडला.इं.जि चोले यांनी या पाझर तलावाची पुनर बाधणी कामाचं स्वरूप लागणारा वेळ तसेच काम कशा पद्धतीने करायचं आहे यापासून ३:५० हेक्टर जमीन सिंचनाखाली कशी व किती दिवसात येईल याबद्दल सविस्तर माहिती दिली.या सर्व कामांसाठी प्राज फाऊंडेशन पुणे यांच तसेच विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटी चे अर्थसहाय्य लाभणार आहे प्राज फाऊंडेशन पुणे चे सि एस आर मॅनेजर सुरेश रेणूसे यांनी या कामासाठी आमचे सहकार्य लाभले असून समाजातील विविध घटक, सामाजिक कार्यकर्ते, उद्योग व्यवसायीक तसेच शेतकरी यांना पण या पाझर तलाव साठवण क्षमता व जलसंधारण जलक्रांती साठी आपला हातभार लावला लागणार आहे हे काम माझच आहे या जलसिंचन कामातुन माझाच फायदा होणार असल्याची भावणा निर्माण झाल्याशिवाय उदेश यशस्वी होणार नाही त्यासाठी सर्वांनी तन मन धन अर्पण करून कामं करून आपण अनेक वर्षांपासून तहानलेल्या घाटसावळी करांच्या जिवणात जलक्रांती घडवून त्यांना बागायतदार होण्यासाठी प्रयत्न करावेत असे या प्रसंगी सुरेश रेणूसे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

उद्घाटनप्रसंगी घाटसावळी महसूल मंडळाधिकारी बांगर , तलाठी पोपळे , आखाडे सरपंच प्रतिनिधी दादासाहेब लांडे, समर्थ उद्योग समूहाचे बाळकिशन तापडिया,अरूण लांडे मा पं स उपसभापती,ओमतात्या खौतड, चंद्रकांत पाटील लांडे, उपसरपंच दिलीप दादा लांडे, संतोष लांडे, सुबोध फड, राधेश्याम फड,राम फड पत्रकार सतिश लांडे पाटील, आस्लम पठाण.शिद्धांत खवतड बारीक कडेकर,वसंत काका फड ,मा उपसरपंच आप्पासाहेब फड,लहू देवकर, भास्कर फड गणेश लांडे, अच्युत लांडे, नवनाथ लांडे, भिमराव लांडे, धोंडीराम बोंगाणे सह महिला शेतकरी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्र संचालन महेश लांडे यांनी केले.

## गजानन नागरी सहकारी बँकेच्या नफ्यात दुपटीने वाढ; 'ग्रॉस एनपीए'मध्ये ऐतिहासिक घट

बीड । प्रतिनिधी

स्थानिक आर्थिक विकासात मोलाची भूमिका बजावणाऱ्या श्री गजानन नागरी सहकारी बँक लि., बीड यांनी ३१ मार्च २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी नोंदवत आपली भक्कम प्रगती कायम ठेवली आहे. ठेवी, कर्जवाटप, नफा, गुंतवणूक आणि आर्थिक शिस्त या सर्वच घटकांमध्ये लक्षणीय वाढ साधत बँकेने 'उत्कृष्ट' कामगिरीचा मान



पटकावला आहे.बँकेच्या ठेवींमध्ये २३.८० टक्क्यांची वाढ होत त्या १२,७५५.४० लाखांवरून १५,७९१.०४ लाखांपर्यंत पोहोचल्या आहेत. ही वाढ ग्राहकांच्या दृढ विश्वासाचे प्रतीक ठरत आहे. त्याचबरोबर कर्जवाटपातही २९.०२ टक्क्यांची वाढ होऊन कर्जरक्कम ८,०८८.०५ लाखांवरून १०,४३४.८३ लाखांपर्यंत गेली आहे. यामुळे स्थानिक उद्योग, व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक गरजांना चालना मिळत असल्याचे स्पष्ट झाले आहे.नफ्याच्या बाबतीतही बँकेने उल्लेखनीय झेप घेतली आहे. ढोबळ नफा ७६.४६ टक्क्यांनी वाढून २३०.७० लाखांवर, करपूर्व नफा ९०.९२ टक्क्यांनी वाढून २११.४२ लाखांवर, तर निव्वळ नफा ८३.७८ टक्क्यांनी वाढून २०३.५२ लाखांवर पोहोचला आहे. ही आकडेवारी बँकेच्या सक्षम व कार्यक्षम व्यवस्थापनाची साक्ष देणारी ठरत आहे.गुंतवणुकीत १६.९७ टक्क्यांची वाढ होऊन ती ५,४३७.६९ लाखांवर पोहोचली ◀◀ पान २ वर

## परळी-मुंबईत रेल्वेसाठी खा.बजरंग सोनवणेंनी दिल्लीत घेतली रेल्वे मंत्र्याची भेट

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील महत्त्वाचे रेल्वे जंक्शन असलेल्या परळी येथून मुंबईसाठी थेट रेल्वे सेवा उपलब्ध नसल्याने प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत. ही गैरसोय दूर करण्यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी दिल्ली येथे केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन महत्त्वपूर्ण मागण्यांचे निवेदन दिले. लातूर-मुंबई एक्सप्रेस परळीपर्यंत विस्तारित करण्यासह रेल्वेच्या विविध प्रश्नांकडे त्यांनी केंद्र सरकारचे लक्ष वेधले.

परळी हे बीड जिल्ह्यातील एक प्रमुख रेल्वे जंक्शन आहे. मात्र, येथून मुंबईसारख्या

### लातूर-मुंबई एक्सप्रेस परळीपर्यंत विस्तारीत करण्याची मागणी

महत्त्वाच्या महानगरासाठी थेट रेल्वे गाडी उपलब्ध नाही. याचा सर्वाधिक फटका विद्यार्थी, रुग्ण, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. सध्या अनेक गाड्या केवळ लातूर किंवा बीदरपर्यंतच धावतात, त्यामुळे परळीकरांना मोठा वळसा घालून किंवा खासगी वाहनांनी प्रवास करावा लागतो. ही अडचण लक्षात घेऊन खासदार सोनवणे यांनी रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा सुरू केला आहे. लातूर-मुंबई एक्सप्रेस (गाडी क्र.२२१४३): ही गाडी परळीपर्यंत विस्तारित करण्याची घोषणा पूर्वी झाली होती. मात्र, सध्या ती आठवड्यातून केवळ ३ दिवस बीदरपर्यंत चालवली जाते. उर्वरित दिवसांत ही गाडी परळीपर्यंत वाढवण्यात यावी. नांदेड-पनवेल एक्सप्रेस (गाडी क्र.१७६१४): या गाडीचा विस्तार पनवेलऐवजी लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबईपर्यंत करण्यात यावा, जेणेकरून प्रवाशांचा वेळ वाचेल आणि प्रवास सुखकर होईल, अशी मागणी केली. खा.बजरंग सोनवणे यांनी मंत्र्यांशी चर्चा करताना सांगितले, परळीच्या विकासासाठी आणि बीड जिल्ह्याला ◀◀ पान २ वर

## तालुक्यात ४ व ५ एप्रिल रोजी एसआयआर मॅपिंग शिबिर नागरिकांनी लाभ घ्यावा

### फारूक पटेल, अमर नाईकवाडे व अशफाक इनामदार यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार विशेष संक्षिप्त पुनरिक्षण () अंतर्गत मतदार यादी मॅपिंग प्रक्रियेसाठी बीड तालुक्यात ४ व ५ एप्रिल २०२६ रोजी (शनिवार/रविवार) विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांमध्ये मतदार यादीतील नावांची

मॅपिंग केली जाणार आहे.

या पार्श्वभूमीवर बीड नगर परिषदेचे गटनेते फारूक पटेल, नगरसेवक अमर नाईकवाडे व अशफाक इनामदार यांनी नागरिकांना या शिबिरांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

ते म्हणाले की, मतदार यादीतील अचूकता सुनिश्चित करणे अत्यंत महत्त्वाचे असून प्रत्येक पात्र नागरिकाने आपल्या प्रभागातील मतदान केंद्रावर जाऊन नावाची खातरजमा करून आवश्यक त्या दुरुस्त्या करून घ्याव्यात. यामुळे भविष्यातील निवडणुकांमध्ये कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागणार नाही. तसेच, बीड तालुक्यातील सर्व नागरिकांनी ४ व ५ एप्रिल रोजी (शनिवार/रविवार) सकाळी ९:४५ ते सायंकाळी ६:१५ या वेळेत आयोजित शिबिरात सहभागी होऊन मतदार नोंदणी व मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करावी, असेही त्यांनी नमूद केले. नागरिकांनी आपले मतदान ओळखपत्र सोबत आणावेत आणि या उपक्रमास सहकार्य करावे, असे आवाहनही फारूक पटेल, अमर नाईकवाडे व अशफाक इनामदार यांनी केले आहे.

## उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे नवीन इमारतीत स्थलांतर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई हे कार्यालय आता स्वतःच्या मालकीच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये स्थलांतरित होत आहे.

लातूरछत्रपती संभाजीनगर महामार्गालगत, स्व. विमलताई मुंदडा आरोग्य संकुल, सेंजारी, मौजे लोखंडी सावरगाव येथे बांधण्यात आलेल्या नवीन कार्यालयीन इमारतीमध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाईचे सर्व कामकाज दि. ०६ एप्रिल २०२६ पासून सुरू होणार आहे. त्यामुळे वाहन नोंदणी, वाहन परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), परवाने, कर भरणा तसेच इतर सर्व परिवहन कार्यालयाशी संबंधित कामकाजासाठी नागरिकांनी यापुढे लोखंडी सावरगाव येथील नवीन कार्यालयात उपस्थित राहून आपली कामे करून घ्यावीत, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अंबाजोगाई यांनी केले आहे. नवीन कार्यालयीन इमारतीमुळे नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार असून कामकाज अधिक सुलभ व जलद गतीने होण्यास मदत होणार आहे. नागरिकांनी याची नोंद घेऊन पुढील सर्व कामकाजासाठी लोखंडी सावरगाव येथील नवीन कार्यालयाचा उपयोग करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## डिजिटल अरेस्ट करून २३ लाखांची फसवणूक

### जळगावच्या पती-पत्नीसह तिघांना बीड सायबर पोलिसांकडून अटक

बीड । प्रतिनिधी

'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली परळी येथील एका व्यक्तीची २३ लाख ४२ हजार ८८८ रुपयांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळीचा बीड सायबर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी जळगाव येथून पती-पत्नीसह तिघांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून रोख रक्कम आणि बँक खात्यातील रक्कम असा एकूण ६ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.



नेमकी घटना काय?

परळी येथील रहिवासी सूर्यकांत निवृत्तीराव मुंडे यांना सायबर चोरट्यांनी 'डिजिटल अरेस्ट'ची भीती दाखवून तब्बल २३ लाख ४२ हजार ८८८ रुपयांना लुटले होते. याप्रकरणी बीड सायबर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अशी झाली कारवाई

तक्रार प्राप्त होताच बीड सायबर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि डिजिटल पुराव्यांच्या आधारे तपास सुरू केला. हे आरोपी जळगाव येथील असल्याचे ◀◀ पान २ वर

## बसस्थानकावर महिला प्रवाशाचे मंगळसूत्र चोरणारी महिला जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

बीड । प्रतिनिधी

केज बस स्थानकावर गर्दीचा फायदा घेऊन महिला प्रवाशाचे सोन्याचे दागिने चोरणाऱ्या एका सराईत महिला चोरट्यास स्थानिक गुन्हे शाखेने () अटक केली आहे. आरोपी महिलेकडून १ लाख ४२ हजार रुपये किमतीचे ९.५ ग्रॅम वजनाचे मिनी गंठन जप्त करण्यात आले आहे.

नेमकी घटना काय?

फुलेनगर, केज येथील रहिवासी मंजुश्री हरीराम जगदाळे या १९ मार्च २०२६ रोजी केज बस स्थानकावरून लातूरला जाण्यासाठी निघाल्या होत्या. नाशिक-लातूर बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील ९.५ ग्रॅम वजनाचे मिनी गंठन लंपास केले. याप्रकरणी केज



पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सीसीटीव्ही आणि गोपनीय माहितीच्या आधारे अटक

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांच्या पथकाने या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू केला होता. पथकाने बस स्थानकाचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, एक संशयास्पद महिला फिर्यादीच्या मागे उभी असल्याचे आणि चोरीनंतर बसमध्ये न चढता बाहेर निघून जाताना दिसली. २ एप्रिल २०२६ रोजी सदर महिला माऊली नगर, बीड येथे असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तिच्या घरावर छापा टाकून तिला ताब्यात घेतले असता तिने गुन्ह्याची कबुली दिली.

अटक करण्यात आलेली महिला बस स्थानकांवर चोऱ्या करण्याची सवय असलेली सराईत गुन्हेगार असून तिच्यावर विविध पोलीस ठाण्यांत ◀◀ पान २ वर

## आगामी जि.प .निवडणुकीत केज मतदारसंघात शिवसेनेचाच भगवा फडकणार - मनोज शिंदे

केज । प्रतिनिधी

शिवसैनिकांच्या जोरावर केजसह जिल्ह्यात भगवा अधिक उंचावणार असून प्रत्येक गावात शिवसेनेचे मजबूत जाळे उभे करु. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आगामी निवडणुकीसाठी जिल्ह्यात शिवसैनिकांचे संघटन अधिक मजबुत करणार आहे. शिवसैनिकांनी जनतेच्या प्रश्नावर तत्परतेने काम करुन शिवसेनेची ओळख अधिक मजबुत करावी, असे प्रतिपादन बीड जिल्हा संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांनी



केले. तर शिवसेना हा केवळ पक्ष नसून जनतेशी जोडलेली चळवळ असल्याचे प्रतिपादन मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन यांनी केले.

केज तालुका शिवसेना संपर्क कार्यालयाचा शुभारंभ संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.३) करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, उपनेत्या माजी आमदार संगीता ठोंबरे, शिवसेन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात मनोज शिंदे यांनी म्हणाले की, बीड जिल्हा हा शिवसेनेच्या दृष्टीने महत्त्वाचा असून येथे संघटन अधिक भक्कम करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने सक्रिय भूमिका बजावणे गरजेचे आहे. गावागावांत शाखा बळकट करून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत शिवसेनेचा विचार पोहोचवला जाईल यासाठी शिवसैनिकांनी काम करावे. आगामी काळात शिवसैनिकांच्या बळावरच मोठे यश मिळवू असे आवाहन शिंदे यांनी केले. मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन यांनी आपल्या मार्गदर्शनात शिवसेना ही केवळ राजकीय संघटना नसून जनतेच्या भावना ◀◀ पान २ वर

## अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सकपदी डॉ.नागेश चव्हाण

बीड । प्रतिनिधी

जिल्हा रुग्णालयाच्या अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सकपदी डॉ. नागेश चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे गुरुवारी त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. डॉ. चव्हाण यांनी बीड येथील जिल्हा रुग्णालयात यापूर्वी बीड जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक व अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून उल्लेखनीय काम केलेले आहे. यापूर्वी यवतमाळ अहिल्यानगर आदी ठिकाणी त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून काम केलेले आहे. आता पुन्हा बीडचे अतिरिक्त जिल्ह्यात शैल्य चिकित्सक पदी नियुक्ती झाली असून त्यांनी गुरुवारी पदभार स्वीकारला आहे. वरिष्ठ पदावर कार्यरत असतानाही त्यांनी स्वतः शस्त्रक्रिया करून रुग्णसेवा केली.



## माजलगावमध्ये धरण परिसरात मृतदेह; घातपात की आत्महत्या ?

माजलगाव । प्रतिनिधी

शहरापासून जवळच असलेल्या धरण परिसरातील पाणी फिल्टर टाकीजवळ एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ही घटना दि ०३ एप्रिल शुक्रवार रोजी सकाळच्या सुमारास उघडकीस आली.माजलगाव धरण परिसरात दि ०३ एप्रिल शुक्रवार रोजी सकाळी एक खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. धरणाच्या पाणी फिल्टर टाकीजवळ एका अंदाजे ३० ते ३५ वर्षीय अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.ही घटना उघड



होताच परिसरात विविध चर्चांना उधाण आले असून, पोलिसांनी या प्रकरणाचा तपास युद्धपातळीवर सुरू केला आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, माजलगाव धरण परिसर हा फिरण्यासाठी आणि निसर्गरम्य वातावरणासाठी ओळखला जातो.दि ०३ एप्रिल शुक्रवारी सकाळी नेहमीप्रमाणे काही नागरिक या परिसरात फिरायला गेले होते. यावेळी पाणी फिल्टर टाकीजवळ एक व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत पडलेली काही जणांना दिसून आली. सुरुवातीला ती व्यक्ती झोपली असावी ◀◀ पान २ वर

## प्रा.डॉ.सारिका विश्वाबंर जाधव यांना ''पीएचडी. पदवी'' प्रदान

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे साखरे बोरगांव येथिल कै.प्रल्हादराव जाधव यांची नात व श्री.विश्वाबंर अण्णा जाधव यांची कन्या प्रा. डॉ.सारीका जाधव .यांना शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च समजली जाणारी ''पीएच.डी.( विद्यावाचस्पती )ही पदवी.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने प्रदान केली आहे.त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर भूगोल विभागा अंतर्गत.



''बीड जिल्ह्यातील रस्ते वाहतूक जाळ्याचा भौगोलिक अभ्यास'' या विषयावर जनविकास महाविद्यालय, बनसारोळा येथील भूगोल विभागाचे संशोधक मार्गदर्शक प्रा. डॉ.पिसाळ एस.जी.यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदिर्घ शंशोधन करून आपला शोधप्रबंध विद्यापीठाला सादर केला होता.त्यास विद्यापीठाने २० फेब्रुवारी २०२६ रोजी मान्यता देवून त्यांना '' पीएच.डी.''ही पदवी नुकतीच प्रदान केली आहे. या त्यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून कुटुंबीय, मित्रपरिवार व शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.त्यांच्या या यशाबद्दल बंकट स्वामी संस्थान नेकनूर चे मठाधिपती ह.भ.प.लक्ष्मण ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सुनेत्रा पवारांचे अध्यक्षपद धोक्यात? पटेल- तटकरेंच्या सहीने झाली कोंडी

**पुणे । प्रतिनिधी**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (छउझ छशुी) अंतर्गत संघर्ष अधिक तीव्र होताना दिसत आहे. पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्याकडून पक्षावर ताबा मिळवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे आरोप केले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर पक्षाच्या (छउझ छशुी) राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्राने राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. सुनेत्रा पवार यांनी २८ जानेवारीनंतर (अजित पवारांच्या निधनानंतर) पक्षाकडून झालेला कोणताही पत्रव्यवहार (छउझ छशुी) ग्राह्य धरू नये, अशी मागणी निवडणूक आयोगाकडे केली होती.

या पत्रामुळे प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांची कोंडी झाली असल्याचे सांगितले जात होते. मात्र आता याच पत्राच्या परिणामस्वरूप सुनेत्रा पवार यांचे राष्ट्रीय अध्यक्षपद आणि त्यांचे पुत्र पार्थ पवार यांची राज्यसभा खासदारकी धोक्यात आल्याची चर्चा राजकीय सूत्रांमध्ये रंगली आहे. सुनेत्रा पवार यांच्या सहीने सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या पत्रात २८ जानेवारीनंतर निवडणूक आयोगासोबत झालेला सर्व पत्रव्यवहार रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. या पत्रात सुनेत्रा पवार यांनी स्वतःला राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून उल्लेख केला असून, पक्षातील इतर काही प्रमुख नेत्यांच्या पदांचा उल्लेख टाळल्याचे दिसते. पत्रात फक्त सुनेत्रा पवार (राष्ट्रीय अध्यक्ष) आणि शिवाजीराव गर्जे (खजिनदार) यांचाच उल्लेख असल्याचे समोर आले आहे.



प्रफुल्ल पटेल यांनी अजित पवारांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती करण्यासाठी कार्यकारिणी बैठकीसंदर्भात निवडणूक आयोगाला पत्र लिहिले होते. मात्र सुनेत्रा पवार यांच्या नव्या पत्रामुळे २८ जानेवारीनंतर झालेल्या सर्व प्रक्रिया आणि नियुक्त्या रद्द होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.सूत्रांच्या माहितीनुसार, पार्थ पवार यांच्या राज्यसभा खासदारकीसाठी (एबी फॉर्म) प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या सह्या आहेत. जर सुनेत्रा पवार यांच्या पत्रानुसार २८ जानेवारीनंतरचा सर्व पत्रव्यवहार रद्द झाला, तर या फॉर्मची वैधता देखील प्रश्नांकित होऊ शकते. त्यामुळे सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षपदासोबतच पार्थ पवार यांची खासदारकी देखील धोक्यात येण्याची दाट शक्यता असल्याचे राजकीय निरीक्षक सांगत आहेत.

पक्षातील अंतर्गत संघर्ष अजित पवारांच्या निधनानंतर (२८ जानेवारी २०२६) फक्त १८ दिवसांत प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि इतर नेत्यांनी निवडणूक आयोगाला पत्र पाठवून पक्ष संविधानात बदल करून कार्याध्यक्ष पदाला अधिक अधिकार देण्याचा प्रयत्न केल्याचे आरोप राष्ट्रवादीतील काही नेत्यांकडून करण्यात आले आहेत. या पत्रात सुनेत्रा पवार, पार्थ पवार किंवा बहुसंख्य आमदारांना विश्वासात घेतल्याचे दिसत नाही.

सुनेत्रा पवार यांनी २६ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय अध्यक्षपदी एकमताने निवड झाल्यानंतर १० मार्च २०२६ रोजी हे पत्र निवडणूक आयोगाला पाठवले होते. या पत्रामुळे पक्षातील तटकरे-पटेल गट आणि पवार कुटुंबीयांमधील मतभेद अधिक स्पष्ट झाले आहेत.

## सांगवी सांडस येथे विहिरीत पडलेल्या बिबट्याचा थरारक बचाव; वनविभागाच्या शिताफीचे कौतुक

**उरुळी कांचन । प्रतिनिधी**

हवेली तालुक्यातील सांगवी सांडस येथे पहाटे विहिरीत पडलेल्या बिबट्याला,पुणे वनविभागाने अत्यंत शिताफीने बाहेर काढत त्याचे प्राण वाचवले.या धाडसी व नियोजनबद्ध बचावकार्यामुळे वनविभागाच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. वनपरिक्षेत्र आधिकारी सुरेश वरक यांनी दिलेल्या माहितीनुसार सांगवी सांडस येथील सर्जेराव मानाजी सातव यांच्या शेतातील विहिरीत बिबट्या पडल्याची माहिती वनविभागाला पहाटे पाच वाजता मिळाली. तत्काळ वनसंरक्षक आशिष ठाकरे व उपवनसंरक्षक महादेव मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश वरक यांच्या नेतृत्वाखाली बचाव पथक





घटनास्थळी दाखल झाले.अत्यंत काळजीपूर्वक व कुशलतेने राबवलेल्या या मोहिमेत बिबट्याला सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात यश आले.

यानंतर बिबट्याची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी त्याला बावधन येथील वन्यप्राणी उपचार केंद्रात हलविण्यात आले. या संपूर्ण कारवाईत वनपरिमंडळ अधिकारी प्रमोद रासकर, वनरक्षक अनिल राठोड,अंकुश कचरे,पूजा कुबल,प्रीती नागले,प्रिया अकेन,कोमल सपकाळ,ऋतुजा कचरे तसेच वनसेवक बापू बाजारे यांनी मोलाची भूमिका बजावली. याकामी लोणीकंद पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिता राठोड यांचेही सहकार्य लाभले. अत्यंत धोकादायक परिस्थितीत जीवाची पर्वा न करता वन्यजीवांचे प्राण वाचवण्यासाठी वनविभागाने दाखवलेली तत्परता आणि संवेदनशीलता निश्चितच कौतुकास्पद आहे.

## ट्रक-स्कुटी धडकेत तरुणीचा मृत्यू

**ओतूर । प्रतिनिधी**

ओतूर (ता. जुन्नर) येथील मोनिका चौकात शुक्रवारी (दि. ३) सकाळी सुमारे ११.३० वाजण्याच्या सुमारास ट्रक व स्कुटी यांच्यात झालेल्या भीषण धडकेत एका तरुणीचा दुर्दैवी मृत्यू झाला. स्नेहल रवींद्र अहिनवे (वय २८, रा. अहिनेवाडी, ता. जुन्नर) असे घटनास्थळी ठार झालेल्या स्कुटीचालक तरुणीचे नाव आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ट्रक आणि स्कुटी यांच्यात मोनिका चौकात जोरदार धडक झाली. धडकेची तीव्रता इतकी होती की स्कुटीवरील महिला चालकाचाजागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव, पोलीस हवालदार भारती भवारी, शामसुंदर जायभाये, किशोर बर्डे, धनंजय पालवे, विश्वास केदार तसेच ट्रॅफिक वॉर्डन शुभम काशीद यांनी घटनास्थळी तातडीने धाव घेतली व पंचनामा करण्याची कार्यवाही सुरू केली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून पुढील तपास ओतूर पोलीस करीत आहेत.

## पुण्यातील सुप्रसिद्ध उद्योगपती ओमप्रकाश रांका यांचे निधन

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील सुप्रसिद्ध उद्योगपती, रांका ज्वेलर्सचे संचालक आणि दानशूर व्यक्तीमत्व ओमप्रकाश नगराज रांका (वय ७१) यांचे गुरुवारी संध्याकाळी (२ एप्रिल) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी (३ एप्रिल) सकाळी ११ वाजता वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. ओमप्रकाश रांका यांचे पार्थिव शुक्रवारी सकाळी मुकुंदनगर येथील निवासस्थानावरुन निघेल.



प्रकृती अस्वास्थ्यामुळे बुधवारी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरु असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्तात मुलगा वास्तुपाल आणि दोन मुली, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. पुणे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष आणि प्रसिद्ध सराफ व्यावसायिक फतेचंद रांका यांचे ते कनिष्ठ बंधू होत. पुण्यातील सुप्रसिद्ध सराफी पेढी रांका ज्वेलर्सचा विस्तार करण्यात ओमप्रकाश यांचा सिंहाचा वाटा होता. शालेय शिक्षण संपवून त्यांनी लगेचच रविवार पेठ येथील रांका ज्वेलर्सच्या पेढीमध्ये काम करायला सुरुवात केली होती.

व्यवसायासोबतच दानशूर व्यक्तीमत्व म्हणून त्यांचा लौकिक होता. पुणे आणि बाहेरील अनेक धार्मिक, सामाजिक संस्थांशी ते जोडलेले होते. जीतो (गखढज) पुणे चॅप्टरचे माजी अध्यक्ष म्हणून त्यांनी चांगली कामगिरी केली होती. याशिवाय, धार्मिक क्षेत्रामध्ये त्यांनी नाकोडा राजस्थानला मोठी भव्य धर्मशाळा बांधली आहे. अनेक मंदिरांची उभारणी करण्यात त्यांनी योगदान दिले होते. पुण्याजवळील भोसरी येथील गौशाळा हे त्यांच्या सामाजिक कार्यातील ठळक उदाहरण सांगितले जाते. या गौशाळेमध्ये त्यांनी खूप मोठ्या सुधारणा केल्या होत्या. सामाजिक आणि धार्मिक कार्यामध्ये त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला. गरजू व्यक्तींना मोकळ्या हाताने मदत करण्यासाठी ते प्रसिद्ध होते.

## पुण्यातून धक्कादायक घटना.!
### कंपनीसमोरून लाडक्या 'नन्या'चे अपहरण

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील नन्हे परिसरात प्राणिमित्रांना हादरवून टाकणारी घटना घडली असून, एका कंपनीसमोर झोपणाऱ्या 'नन्या' नावाच्या भटक्या श्वानाला अज्ञात व्यक्तींनी मध्यरात्री पळवून नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी नन्हे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांकडून तपास सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, लता गज्जर ( ५९) व प्रीती पवार या गेल्या अनेक वर्षांपासून भटक्या श्वानांची सेवा करत आहेत. 'प्राणीमित्र ॲनिमल वेल्फेअर फाउंडेशन'च्या माध्यमातून त्या परिसरातील सुमारे ६० भटक्या श्वानांना दररोज अन्न देतात.नन्हे येथील 'कुतूहल सायन्स ॲक्टिव्हिटीस प्रा. लि.' या कंपनीचे संचालक सुयश ठाके यांनी या कार्यकर्त्यांकडून २०२९ मध्ये दोन भटके श्वान सांभाळण्यासाठी घेतले होते. कंपनीने गेली सात वर्षे त्या श्वानांची योग्य काळजी घेतली होती. त्यांचे लसीकरण व निर्बीजीकरणही करण्यात आले होते. दरम्यान, १५ फेब्रुवारी रोजी पहाटे सुमारे ३



वाजता एक पांढरी 'इको' गाडी कंपनीसमोरील गल्लीत आली. सीसीटीव्ही फुटेजनुसार, गाडीतून उतरलेल्या दोन व्यक्तींनी अन्नाचे आमिष दाखवून 'नन्या' नावाच्या नर कुत्र्याला जवळ बोलावले आणि त्याला जबरदस्तीने गाडीत टाकून पळ काढला. 'नन्या' हा कंपनीतील कर्मचाऱ्यांचा अत्यंत लाडका व प्रेमळ कुत्रा होता. तो नियमित लसीकरण झालेला असल्याने कोणालाही धोका नव्हता. त्यामुळे त्याचे अशा प्रकारे अपहरण झाल्याने परिसरात संतापाची भावना व्यक्त होत आहे.

घटनेचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असले तरी गाडीचा नंबर स्पष्ट दिसत नसल्याने आरोपींचा शोध घेण्यात अडचणी येत आहेत. प्राणिमित्रांनी या घटनेला प्राण्यांवरील क्रूरतेचा प्रकार असल्याचे सांगत आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. तक्रारदारांनी पोलिसांना विनंती केली आहे की, या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन गुन्हा नोंदवावा, आरोपींना शोधून 'नन्या'ला सुरक्षित परत आणावे आणि दोषींना कायद्यानुसार शिक्षा द्यावी.

## महापालिका आयुक्तांच्या 'त्या' वक्तव्यावरुन शहरभरातून संताप

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी शहराच्या जागतिक ओळखीबद्दल केलेले विधान अत्यंत निंदनीय आणि बेजबाबदार आहे. ज्या शहराने शून्यातून विश्व निर्माण करून जागतिक पातळीवर स्वतःचे स्थान निर्माण केले, त्या शहराबद्दल अशी मुक्ताफळे उधळणे हा येथील नागरिकांच्या भावनांचा अपमान आहे, असे मत व्यक्त करीत शहरातील लोकप्रतिनिधींसह सामाजिक कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला आहे.





पालिकेच्या चिखली येथील जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्या वतीने मुंबई येथील अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीयस्तरावर गायन व वादन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्या संदर्भातील सोमवारी झालेल्या पत्रकार परिषदेत आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी शहराला जगात कोण ओळखत नाही, असे वादग्रस्त वक्तव्य केले होते.

त्यावरून संताप व्यक्त करण्यात येत आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पावन पदस्पर्शाने पुनीत झालेली तसेच, चापेकर बंधू सारख्या क्रांतिकारकांच्या बलिदानाने पावन झालेली पिंपरी-चिंचवड ही ऐतिहासिक भूमी आहे. औद्योगिकनगरी असलेल्या शहर जगाच्या नकाशावर ठळकपणे चमकत आहे. टाटा मोटर्स, मर्सिडीज बेंझ, बजाज ऑटो आणि फोक्सवॅगनसारख्या असंख्य कंपन्यांमुळे आज शहराची ओळख सातासमुद्रापार आहे. अशा शहराबद्दल जगात कोणी ओळखत नाही, असे विधान करणे म्हणजे या मातीचा आणि संस्कृतीचा अवमान आहे, असे मत अनेकांनी व्यक्त करत आयुक्तांचा निषेध केला आहे. भाजपचे आमदार शंकर जगताप यांनी आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांना सल्ला दिला आहे. त्यांनी शहराची ओळख शोधण्यापेक्षा पालिकेच्या कारभारात पारदर्शकता आणण्यावर आणि प्रलंबित विकासकामांवर लक्ष केंद्रित करावे. शहराची ओळख पुसण्याचा किंवा येथील भूमिपुत्रांच्या अस्मितेला धक्का लावण्याचा प्रयत्न करू नये.आमदार अमित गोरखे म्हणाले, की आयुक्तांनी केलेले वक्तव्य अत्यंत दुर्दैवी, गैरजबाबदार आणि शहराच्या अस्मितेला धक्का देणारे आहे. त्यांनी पिंपरी-चिंचवडच्या गौरवशाली इतिहासाचा आणि औद्योगिक प्रगतीचा गांभीर्याने अभ्यास करावा, त्यानंतरच जबाबदारीने विधाने करावीत. शहराची जागतिक ओळख ही कष्टाने निर्माण झाली असून, अशा प्रकारची अनाठायी वक्तव्ये करणे अत्यंत दुर्दैवी आहे.

## अवकाळी पावसाचा पुणे जिल्ह्याला तडाखा; १२ तालुक्यांतील १०५ गावे बाधित, दोघांचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यात १ व २ एप्रिल रोजी झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीमुळे शेती व नागरी भागात मोठे नुकसान झाले आहे. जिल्ह्यातील १२ तालुक्यांमधील सुमारे १०५ गावे बाधित झाली असून सुमारे २,३५७ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

या नैसर्गिक आपत्तीत दोन ठिकाणी जीवितहानी झाली. पुणे शहरातील पर्वती परिसरात झाड कोसळून रंजना नवनाथ गिरी (वय ५७) यांचा मृत्यू झाला. तसेच खेड तालुक्यात पोल्ट्री शेडचे बांधकाम सुरू असताना



वादळामुळे भिंत कोसळून अलका गणपत मसले (वय ५३) यांचा जागीच मृत्यू झाला. याशिवाय खेड तालुक्यात एका गाईचा झाडाची फांदी पडून मृत्यू झाल्याची घटना घडली. पुणे महानगरपालिका हद्दीतही पावसाचा मोठा परिणाम जाणवला. पाणी साचणे, झाडे पडणे, केबल तुटणे आदी स्वरूपाच्या सुमारे १४५ तक्रारी आपत्कालीन कक्षाकडे प्राप्त झाल्या. त्यापैकी सुमारे २९ तक्रारी गंभीर होत्या. सर्व तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करत संबंधित क्षेत्रीय कार्यालयांमार्फत मदत पुरविण्यात आली. शेती क्षेत्रात इंदापूर, शिरूर, आंबेगाव, दौंड आणि बारामती तालुक्यांना सर्वाधिक फटका बसला आहे. कांदा, गहू, मका, ज्वारी, भाजीपाला यांसह द्राक्ष, डाळिंब, केळी, आंबा यांसारख्या फळपिकांचे नुकसान झाले आहे. शिरूर तालुक्यात सर्वाधिक क्षेत्र बाधित झाले असल्याची नोंद आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने सर्व संबंधित यंत्रणांशी समन्वय साधत मदतकार्य सुरू केले आहे. नुकसानग्रस्त भागांमध्ये तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून नागरिकांसाठी आपत्कालीन कक्ष २४ तास कार्यरत ठेवण्यात आला आहे. मदतीसाठी १०७७ हा टोल फ्री क्रमांक उपलब्ध करण्यात आला आहे.बारामतीमध्ये १२ गावे बाधित झाली असून ,२८१ लाभार्थी संख्या आहे. बारामतीमध्ये कांदा, भाजीपाला, फळपिके, डाळिंब या पिकांवर परिणाम झाला आहे. एकूण पुणे जिल्हात १२७ गावे बाधित झाली असून ,४४९८ लाभार्थी हे २३५७ हेक्टरीमध्ये आहेत.

## ग्रामपंचायत कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील कान्हूर मेसाई ग्रामपंचायतीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच घेताना रंगेहाथ पकडले. भरत पोपट गायकवाड असे त्याचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध शिक्रापूर पोलिस ठाण्यात भष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कान्हूर मेसाई येथील तक्रारदाराच्या जागेवर काही व्यक्तींनी अतिक्रमण करून घर उभारले होते. या प्रकरणात संबंधितांनी ग्रामसेवकाकडून नियमबाह्य पद्धतीने ८-अ उतारा तयार करून घेतल्याचा आरोप आहे. याबाबत न्याय मिळावा म्हणून तक्रारदाराने शिरूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे अर्ज केला होता. या अर्जाची चौकशी करून अहवाल वरिष्ठांकडे पाठविण्यासाठी गायकवाड याने तक्रारदाराकडे थेट १० ते १५ हजार रुपयांची लाच मागितली. लाच स्वतःसाठी आणि ग्रामसेवकासाठी असल्याचेही त्याने स्पष्ट केले होते, अशी माहिती तपासात उघड झाली आहे. याबाबत तक्रारदाराने पुणे येथील लाचलुचपत विभागाकडे तक्रार दाखल केली. ६ जानेवारी रोजी एसीबीने सापळा रचून पडताळणी केली असता, गायकवाड याने स्वतःसाठी आणि ग्रामसेवक घासले यांच्या नावाने २ हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. यानंतर १ एप्रिल रोजी एसीबीने कारवाई करत गायकवाडला अटक केली अशी माहिती पोलिस निरीक्षक शैलजा शिंदे यांनी दिली.

## मंदिर यात्रांना माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांची भेट

**पुणे । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील नारोडी येथील श्री मुक्तादेवी यात्रेनिमित्त तसेच चिंचोली येथील मळगंगा माता मंदिर जीर्णोद्धार व गिरवली येथील श्री भैरवनाथ महाराज मंदिर जीर्णोद्धार निमित्त राज्याचे माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी भेट देऊन ग्रामस्थांना विकासासाठी चे आश्वासन दिले. या गावातील एकरूपतेचे वळसे पाटील यांनी आपल्या भाषणात कौतुक केले.

नारोडी येथील श्री मुक्तादेवी यात्रेनिमित्त वळसे पाटील यांनी भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला.यावेळी जिल्हा परिषद निवडणुकीत गावानं मोठ्या मताधिक्याने राष्ट्रवादी काँग्रेसला मतदान केल्याबद्दल ग्रामस्थांचे आभार मानले. यावेळी प्रलंबित कामाबाबत मी नक्कीच पुढाकार घेऊन ती पूर्ण करील. असे आश्वासन दिले.यानंतर देवीचे दर्शन घेऊन वळसे पाटील यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांसमवेत भारत मातेच्या घोषणा दिल्या. दरम्यान सकाळी



हनुमान जन्माचे कीर्तन झाले. या यात्रेनिमित्त पारंपारिक लेझीम पथकाच्या साह्याने सकाळी देवीचे हारतुरे व चोळी पातळाची मिरवणूक मोठ्या दिमाखात पार पडली. दुपारी जोरदार पाऊस झाल्याने यात्रेत अडथळा आला होता.परंतु सायंकाळी पाऊस उघडल्यानंतर नागरिक व महिला यांनी गर्दी केली होती. चिंचोली येथे ग्रामस्थांच्या लोकवर्गणी व देणगीतून मळगंगा मातेचे मंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिराच्या उद्घाटन सोहळ्यास वळसे पाटील यांनी उपस्थित राहून ग्रामस्थांना शुभेच्छा दिल्या. पारंपरिक वाद्य व महिलांच्या उपस्थितीत या मंदिराचा कलशारोहण समारंभ उत्साहात पार पडला. गिरवली येथील ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज यांच्या नवीन मंदिर बांधकामाचे राज्याचे माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी ग्रामस्थांचे कौतुक केले. एक दर्जेदार मंदिर उभारून ग्रामस्थांनी एकीचे दर्शन घडवलं असल्याचे त्यांनी सांगितले.